दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २१४ । सोमवार १८ मे २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## आत्म्याची अनुभूती...



'सहजयोग'
भाग ५४

आत्मसाक्षात्काराशिवाय तुम्ही सत्याला जाणून घेऊ शकत नाही. तुम्ही आनंदाला प्राप्त करू शकत नाही. आत्म्याची अनुभूती होणे अत्यंत आवश्यक आहे. आता तुम्ही आत्म्याशी संवाद साधू शकता, आत्म्याला विचारू शकता. जोपर्यंत तुम्ही तुमच्या आत्म्याची अनुभूती घेत नाही, तोपर्यंत तुम्ही कोणतेही सत्य जाणून घेऊ शकत नाही. म्हणजेच, जोपर्यंत तुमचा त्याच्याशी संबंध जोडला जात नाही. सहजयोगामुळे आत्म्याशी संबंध जोडणे अत्यंत सोपे होते. काही जणांना तो थोड्या वेळासाठी होतो, तर काही जणांना तो कायमचा होतो. आत्म्याशी संबंध जोडल्यानंतर आपल्याला त्याच्याशी तादात्म्य पावावे लागते. म्हणजेच, तुम्ही मला ओळखले, ठीक आहे; तुम्ही मला जाणले, ठीक आहे; पण मी काही तुम्ही झालेली नाही. मी तुम्हाला पाहत आहे आणि तुम्ही मला पाहत आहात. या क्षणी मी जर तुमच्या दृष्टीने पाहू शकले, तर त्याच क्षणी तादात्म्य झाले.आत्म्याशी तदाकार (एकरूप) होण्यासाठी, सर्वात आधी 'मी नाही' असे मानले पाहिजे. – २८ डिसेंबर १९७७ मुंबई

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### घटसर्पच्या प्रादुर्भावाने २ चिमुकल्यांचा मृत्यू

नाशिक : मालेगावात दोन चिमुकल्यांचा घटसर्प आजाराने मृत्यू झाल्याने आरोग्य यंत्रणा हादरली असून मालेगाव शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटसर्प आजार कालबाह्य झाल्याचा दावा शासनाकडून करण्यात येतो. मात्र, दोघ लहान मुलांच्या मृत्युने म ोठे प्रश्नचिन्ह उभारले असून वेगवेगळ्या लसीकरणानंतरही मृत्यूची घटना घडल्याने आरोग्य व्यवस्थेच्या कारभारवर प्रश्नचिन्हे उपस्थित होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मालेगावात वास्तव्यास असलेल्या राजस्थानी कुटुंबातील ही दोन बालके असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, या घटनेमुळे मालेगाव शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर आता मोठे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, मालेगावात आरोग्याचे प्रश्न नेहमीच गंभीर स्वरूपाचे पाहायला मिळतात. कधी काळी कोरोनाचे हॉटस्पॉट मालेगाव बनलेले होते तर टायफाईड, डेंग्यू, मलेरिया, डायरिया आदी आजार तर नित्याचेच झालेले आहेत. त्यामुळे, महापालिका प्रशासन व आरोग्य यंत्रणांनी घटसर्प रोगाने बाधित दोन चिमुकल्यांचा मृत्यू गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

## शनि अमावस्येची पूजा करण्यासाठी गेलेल्या

# मित्र-मैत्रिणीला भोंदूबाबाने संपवले!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**धुळे :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात आणि सोलापूरच्या 'मनोहर मामा'च्या भोंदूगिरीच्या घटना ताज्या असतानाच, आता धुळे जिल्ह्यातून अंधश्रद्धेची एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. साक्री तालुक्यातील जैताणे येथे एका भोंदूबाबाने शनी अमावस्येच्या रात्री पूजाविधीसाठी आलेल्या एका मित्र आणि मैत्रिणीचा जीव घेतल्याची घटना घडली आहे. या प्रकरणामुळे धुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

जयश्री रजनीकांत काकुस्ते (वय २५) आणि अक्षय गंगाधर सोनवणे अशी मृत्यू झालेल्या दोघा मित्र-मैत्रिणींची नावे आहेत. मृत जयश्री ही एका फायनान्स कंपनीत काम करत होती, तर अक्षय हा स्थानिक ग्रामपंचायतीमध्ये शिपाई



पदावर कार्यरत होता. तसेच त्याचा वडिलोपार्जित केबलचा व्यवसाय देखील होता.

शनिवारी सकाळी साक्री तालुक्यातील निजामपूर परिसरातील रायपूर-भडगाव रस्त्यावरील टेंबे फाट्याजवळ एका शेतात अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आला. या महिलेचे तोंड रुमालाने बांधलेले होते आणि तिच्या मृतदेहावर एक दुचाकी टाकून देण्यात आली होती, जेणेकरून हा अपघाताचा प्रकार वाटावा. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मोठी गर्दी केली. निजामपूर पोलिसांनी तात्काळ पथकासह घटनास्थळ गाठून फॉरेन्सिक टीमला पाचारण केले आणि वैज्ञानिक पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली. तपासात हा मृतदेह जयश्री काकुस्ते हिचा असल्याचे निष्पन्न झाले.

घटनास्थळाचा पंचनामा करताना पोलिसांना एक केसरी रंगाचा रुमाल आढळून आला. हा रुमाल या संपूर्ण तपासात सर्वात महत्त्वाचा दुवा ठरला. पोलीस श्वान पथकाला (ड्रीस डॉग) हा रुम ाल सुंघवण्यात आला असता, श्वानाने माग काढत थेट भोंदूबाबा योगेश ऊर्फ भैय्या बापू खैरनार (रा. जैताणे) याच्या मठाचा रस्ता दाखवला. पोलिसांनी संशयावरून तात्काळ या भोंदूबाबाला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची **(पान ४ वर)**

■ **पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली ही भोंदूंची कीड समूळ नष्ट करण्यासाठी सरकार मात्र कोणतंही पाऊल उचलताना दिसत नाही. आज राज्यात स्व. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रयत्नांतून झालेल्या जादूटोणाविरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी झाली असती आणि शक्ती कायद्यासारखा कठोर कायदा असता आणि त्यानुसार आजवरच्या गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा मिळाली असती तर महिलांचे असे खून करण्यापर्यंत भोंदूंची मजल गेली नसती. त्यामुळंच सरकारने तातडीने कठोर असा शक्ती कायदा आणावा आणि जादूटोणाविरोधी कायद्याचीही कठोरपणे अंमलबजावणी करावी.**

**– आ. रोहित पवार**

# कल्याण रेल्वे स्थानकात ट्रेनची वाट पाहणाऱ्या अहिल्यानगरच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## नराधमाला पोलिसांकडून अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** कल्याण रेल्वे स्थानकात एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील या मुलीला कल्याणहून खोपोली येथे आपल्या मामाच्या घरी जायचे होते. त्यासाठी ही मुलगी कल्याण रेल्वे स्थानकात लोकल ट्रेनची वाट पाहत उभी होती. त्यावेळी आरोपीने तिचा मोबाईल फोन हिसकावून घेत तिला आपल्यासोबत येण्यास भाग पाडले आणि तिच्यावर अत्याचार केले. या घटनेमुळे कल्याणमध्ये एकच खळबळ उडाली असून कायदा-सुव्यवस्थेबाबर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### नराधमाला फाशी झाली पाहिजे: आ. राजेश मोरे

अतिशय धक्कादायक घटना घडली आहे. हे आरोपी महिलांना टार्गेट करून अतिप्रसंग करतात. यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करावी. मी रेल्वे पोलीस अधिकारी यांच्याशी चर्चा केली असता या आरोपीने त्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला अत्याचार करून तो पळून गेला होता, पोलिसांनी त्याला पकडले. अशा नराधमांना जलद गतीने कोर्टात केस चालवून फाशी दिली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. नराधमांना सवय झाली आहे, आया बहिणीवर अत्याचार करतात त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी पत्रव्यवहार करून मागणी करणार फास्ट कोर्टात जाऊन यांच्यावर कठोर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी स्थानिक आमदार राजेश मोरे यांनी

पीडित मुलगी अहिल्यानगरमधून आपल्या मामाच्या घरी जाण्यासाठी निघाली होती. अल्पवयीन मुलगी कल्याण रेल्वे स्थानकात ट्रेनची वाट पाहत उभी होती. त्यावेळी सौरभ सोनावणे हा तिला भेटला. त्याने मुलीच्या हातामधील मोबाईल **(पान ४ वर)**

# ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुण्यात घोषणा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारची कर्जमाफी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कॅबिनेट उपसमितीची बैठकही पार पडली आहे. काही जिल्ह्यांकडून अतिरिक्त तांत्रिक माहिती म ागविण्यात आली असून ती प्राप्त होताच प्रक्रिया पूर्ण करून कर्जमाफीची घोषणा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

पुण्यात आयोजित 'पुणे ॲग्रो हॅकॅथॉन २०२६'च्या समारोप कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. राज्यात वीजटंचाई नसल्याचा दावा करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात आवश्यकतेपेक्षा अधिक वीज उपलब्ध आहे. काही भागात तांत्रिक बिघाडांमुळे तात्पुरत्या अडचणी निर्माण होत असल्या तरी राज्यात ऊर्जा संकटाची परिस्थिती नाही.

ड्रग्जविरोधी मोहिमेबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थांचे संकट हे संपूर्ण देशासमोरील मोठे आव्हान आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली देशभर मोहिम राबवली जात असून महाराष्ट्र या कारवाईत अग्रस्थानी आहे. महाराष्ट्राची तुलना 'उडता पंजाब'शी करणे चुकीचे असून राज्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न योग्य नसल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान पार्थ पवार यांनी घेतलेल्या भेटीबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट हा महायुतीतील मित्र पक्ष आहे. त्यामुळे पार्थ पवार यांनी भेट घेणे ही मोठी राजकीय घटना नसून विविध प्रशासकीय आणि राजकीय विषयांवर चर्चा झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कांद्याच्या घसरत्या दरांवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे बांगलादेश आणि आखाती देशांमध्ये कांद्याची निर्यात कमी झाली आहे. उत्पादन वाढले असताना मागणी घटल्याने बाजारभाव कमी झाले आहेत. यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने साडेबारा रुपये प्रतिकिलो दराने कांदा खरेदी सुरू केली असून त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### मराठा समाजासाठी सरकार कटिबद्ध

मराठा आरक्षण आणि विविध म ागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा उपोषणाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूम ीवर मुख्यमंत्री म्हणाले की, मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या आहेत. शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृह, निर्वाह भत्ता आणि उद्योजकता विकासासाठी अनेक उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो तरुण उद्योजक घडले असल्याचे नमूद करत त्यांनी स्पष्ट केले की, कोणतीही योजना बंद करण्यात आलेली नाही. जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रियाही सर्वो च्च न्यायालयाच्या नियमांनुसार सुरू असून सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्रीरामपुरात टवाळखोरांची दहशत

## महाविद्यालयाची बस फोडली; चौघे ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर – शहरातील कांदा मार्केट परिसरात काल सायंकाळी ५ वाजेच्या सुम ारास एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सोडण्यासाठी जात असलेल्या अजितदादा पवार पॉलिटेक्निक कॉलेजच्या बसला अडवून चार टवाळखोरांनी लाकडी दांड्या खाली तोडफोड केली.ते एवढ्या वरच न थांबता या टवाळखोरांनी बस चालकालाही बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे.या सर्व प्रकाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, पोलिसांनी तात्काळ पावले उचलत, चौघा आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथिल अजितदादा पवार पॉलिटेक्निक कॉलेजची बस रोजच्या प्रमाणे विद्यार्थ्यांना



सोडण्यासाठी जात असताना, शहरातील कांदा मार्केट परिसरात बसने आपल्या वाहनाला 'कट' मारला, असा बहाणा करत चार टवाळखोरांनी बस अडवली.त्यानंतर त्यांनी बसवर हल्ला करत तोडफोड सुरू केली. बसचालक अशोक वहाटोळे यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, टवाळखोरांनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी म ारहाण केली. भरचौकात सुरू असलेल्या या राड्यामुळे परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते.या तोडफोडीचा आणि मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल झाला.सदरच्या घटनेनंतर वाहन चालकाने श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे गाठत,घडलेला प्रकार पोलिसांना सांगताच,सदर घटनेची गांभीर्य ओळखून श्रीरामपूर शहर पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्र फिरवली आणि चारही टवाळखोरांना ताब्यात घेतले.परवेज शेख, सलमान पठाण, देविदास शिंदे आणि अल्ताफ सय्यद अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे असून, याप्रकरणी बस चालक अशोक वहाटोळे यांच्या तक्रारीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.भरचौकात कॉलेजची बस फोडणाऱ्या या टवाळखोरांवर पोलीस आता काय कडक कारवाई करणार,? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २२ लाख विद्यार्थ्यांची फसवणूक...

## केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना पदावरुन हटवा : राहुल गांधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** शिक्षणमंत्र्यांनी २२ लाख नीट विद्यार्थ्यांची फसवणूक केली आहे आणि संसदेचा अपमान केला आहे. संसदीय समितीच्या अहवालात विरोधी पक्षाचे खासदार होते, केवळ याच कारणामुळे तो फेटाळण्यात आला. ज्या सरकारचा संसदेवर विश्वास नाही, ते नीट सुधारणांवर विश्वास ठेवू शकत नाही, असे स्पष्ट करत खा. राहुल गांधी यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही निशाणा साधला. त्यांना तात्काळ पदावरून हटवण्याची म ागणी केली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस **(पान ४ वर)**





### एनटीए कार्यालयाबाहेर विद्यार्थ्यांचे आंदोलन

**नीट पेपरफुटीवरून विद्यार्थ्यांचा संताप वाढतच आहे. शनिवारी, एनएसयूआयच्या नेतृत्वाखाली शेकडो विद्यार्थ्यांनी एनटीए कार्यालयाबाहेर आंदोलन केले. आंदोलकांनी आरोप केला की, भ्रष्ट एनटीए आणि मोदी सरकारने नीट घोटाळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त केले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी करा, एनटीएवर बंदी घाला, या दोन मुख्य मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.**



# पाणी अडवा... भविष्य घडवा..!

संपादकीय

विदर्भाच्या मातीत गेली अनेक दशके दुष्काळ, आत्महत्या आणि पाण्याच्या टंचाईची वेदना खोलवर रुजलेली आहे. पाऊस पडतो, पण तो साठत नाही. नद्या आहेत, पण उन्हाळ्यात कोरड्या पडतात. अशा परिस्थितीत जलसंधारण ही केवळ विकासाची योजना राहत नाही, तर ती अस्तित्वाची लढाई बनते. याच पार्श्वभूमीवर पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त नागपुरात आयोजित 'जलसंवाद' आणि 'जलक्रांती' या राष्ट्रीय परिषदांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या परिषदांमधून केवळ जलचर्चा होणार नाही, तर भविष्यातील ग्रामीण भारताचा विकासमार्गही निश्चित होणार आहे.

धावणार्या पाण्याला चालायला लावा, चालणार्या पाण्याला थांबायला लावा आणि थांबणार्या पाण्याला जमिनीत जिरवा हा विचार केवळ घोषवाक्य नाही, तर ग्रामीण समृद्धीचे वैज्ञानिक सूत्र आहे. आजही देशातील अनेक भागात पाणीटंचाईचे मूळ कारण पावसाचा अभाव नसून, पाण्याच्या नियोजनाचा अभाव आहे. डोंगर-दर्‍यांतून वेगाने वाहून जाणारे पाणी जर अडवले, साठवले आणि जमिनीत मुरवले, तर हजारो गावे कायमस्वरूपी पाण्याने समृद्ध होऊ शकतात. गावातील पाणी गावात आणि शेतीतील पाणी शेतीत अडवण्याचा मंत्र प्रत्यक्षात उतरवला, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी मिळू शकते.

गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. कधी अतिवृष्टी, तर कधी दीर्घकालीन दुष्काळ. त्यामुळे पारंपरिक शेती संकटात आली आहे. अशा वेळी जलसंधारण आणि जलव्यवस्थापन ही काळाची अपरिहार्यता ठरते. नदी-नाले पुनरुज्जीवन, गाळ काढणे, पाणलोट विकास, भूजल पुनर्भरण आणि लहान बंधारे यांसारख्या उपाययोजना केवळ पर्यावरणपूरक नाहीत, तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर आहेत. विदर्भातील काही प्रयोगांनी हे सिद्ध करून दाखवले आहे की, योग्य नियोजन आणि लोकसहभाग असेल, तर दुष्काळग्रस्त प्रदेशही हिरवागार होऊ शकतो.

'तामसवाडा पॅटर्न' हे त्याचे सर्वात प्रभावी उदाहरण ठरले आहे. वर्धा जिल्ह्यातील एका मृतप्राय नाल्यापासून सुरू झालेला हा प्रयोग आज ६० हून अधिक गावांपर्यंत पोहोचला आहे. हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले, लाखो घनमीटर जलसाठा निर्माण झाला आणि भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हजारो शेतकरी कुटुंबांना याचा थेट फायदा झाला. हा केवळ जलसंधारणाचा प्रकल्प नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानाचा आराखडा आहे.

'बुलडाणा पॅटर्न' आणि 'पूलवजा बंधारा' यांसारख्या संकल्पनांनीही जलव्यवस्थापनाला नवे परिमाण दिले. एकाच प्रकल्पातून वाहतूक आणि जलसाठा ही दोन्ही उद्दिष्टे साध्य होऊ शकतात, हे या प्रयोगांनी दाखवून दिले. राष्ट्रीय महामार्गांच्या कामांमधून निर्माण होणाऱ्या उत्खननाचा उपयोग तलाव निर्मितीसाठी करून जलसाठे उभारणे, हा तर शाश्वत विकासाचा आदर्श नमुना आहे. यामुळे केवळ पाणीच साठत नाही, तर भूजल वाढते, शेती टिकते आणि स्थलांतरही कमी होते.

आज महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये कोल्हापुरी बंधारे दुरुस्तीअभावी निष्प्रभ झाले आहेत. अशा वेळी 'आर्च विअर'सारखे आधुनिक तंत्रज्ञान कमी खर्चात




अधिक परिणामकारक उपाय देत आहे. पाण्याचा साठा वाढवताना खर्च कमी करण्याचा हा प्रयत्न राज्याच्या जलनीतीसाठी महत्त्वाचा ठरू शकतो. जलसंधारणाच्या कामांकडे केवळ सरकारी योजनांच्या चौकटीत पाहण्याऐवजी, त्याला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, जलसंधारण ही फक्त शेतीपुरती मर्यादित बाब नाही. ती पर्यावरण, जैवविविधता आणि मानवी संस्कृतीच्या संरक्षणाशी जोडलेली आहे. मृत नाल्यांचे पुनरुज्जीवन झाल्यावर परिसरातील झाडे, वन्यजीव आणि शेती पुन्हा जिवंत होते. भूजल वाढल्याने गावांचा आर्थिक आणि सामाजिक आत्मविश्वासही वाढतो. म्हणूनच पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून, भविष्यातील विकासाची मुख्य शक्ती आहे.

आज देशाला मोठ्या धरणांइतकीच गरज लहान, स्थानिक आणि लोकसहभागातून उभ्या राहणाऱ्या जलसंधारण प्रकल्पांची आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भारत आत्मनिर्भर होऊ शकतो. नागपुरातील 'जलसंवाद' आणि 'जलक्रांती' परिषदांनी याच विचाराला नवी दिशा दिली आहे. सरकार, तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन केले, तर भविष्यातील जलसंकटावर मात करणे अशक्य नाही.

पाणी वाचवणे म्हणजे केवळ निसर्ग वाचवणे नव्हे, तर शेती, गाव आणि पुढच्या पिढ्यांचे भविष्य वाचवणे होय. जलसंधारण ही आता पर्यायाची नव्हे, तर अस्तित्वाची लढाई बनली आहे. आणि ही लढाई जिंकायची असेल, तर प्रत्येक गावाने 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मंत्र केवळ घोषणांमध्ये नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची गरज आहे.

# उंबरी बाळापुर येथील तरुणावर महिनाभरात दुसऱ्यांदा बिबट्याचा हल्ला



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर परिसरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, मागील महिन्यात बिबट्याच्या हल्ल्यातून थोडक्यात वाचलेल्या येथील तरुणावर पुन्हा एकदा बिबट्याने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तरुण जखमी झाला असून परिसरात मोठी भीती पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उंबरी बाळापूर येथील युवराज सोपान बर्डे (वय - २६) हे गुरुवारी (१४ मे) रात्री ८ वाजेच्या सुमारास ओझरकडून आपल्या घराकडे उंबरीच्या दिशेने (बर्डे वस्ती) दुचाकीवरून येत होते. शिवेलगत पोहोचले असता, रस्त्याशेजारील झुडपात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्या दुचाकीवर अचानक झेप घेतली. या अनपेक्षित हल्ल्यामुळे युवराज हादरून गेले, मात्र त्यांनी प्रसंगावधान राखून दुचाकीचा वेग वाढवल्याने त्यांचा जीव वाचला. तरीही, बिबट्याने मारलेल्या पंज्यामुळे युवराज यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. विशेष म्हणजे, याच युवराज बर्डे यांच्यावर मागील महिन्यात २१ एप्रिल रोजी सुध्दा सायंकाळी येथून अर्धा किमी अंतरावर बिबट्याने हल्ला केला होता. एकाच महिन्यात दोनवेळा झालेल्या हल्ल्यातून बचावल्याने बिबट्याबाबत मोठी दहशत निर्माण झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच एकलव्य संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल बर्डे यांनी तातडीने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना घटनेची माहिती दिली. तर, जखमी युवराजला संकेत माळी, ज्ञानेश्वर बर्डे, पोपट भुसाळ आदिच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. सध्या युवराज यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, वारंवार होणाऱ्या या हल्ल्यांमुळे उंबरी बाळापूर परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ दहशतीच्या छायेखाली वावरत आहेत. वनविभागाने या बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तातडीने पिंजरा लावावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# सराला बेट येथे राज्यस्तरीय सुर्यनमस्कार स्पर्धेचा थरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** अनंत विभूषित सद्गुरु रामगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने आणि योगीराज गंगागिरी महाराज व ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोदाधाम सराला बेट येथे याही वर्षी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या बालसंस्कार शिबिरार्थींसाठी भव्य राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वारकरी संस्कार आणि योगाचा संगम सरला बेट येथील या शिबिरात दरवर्षीप्रमाणे विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायिक शिक्षण, भगवद्गीता अध्याय पाठांतर, सूर्यनमस्कार आणि योगासनांचे धडे दिले जात आहेत. श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेचे संस्थापक अध्यक्ष संदीप कसार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध आणि संस्कारक्षम शिक्षण देण्यासाठी नित्यनियमाने प्रयत्न केले जातात.

याच शिबिराचे औचित्य साधून या भव्य राज्यस्तरीय स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे. संयुक्त विद्यमाने आयोजन या स्पर्धेचे आयोजन 'दि आर्ट ऑफ लिविंग प्रोजेक्ट भारत' आणि 'श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, वडाळा महादेव' यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वरे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक सुदृढता आणि मानसिक एकाग्रता वाढवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. योग शिक्षकांना आवाहन या स्पर्धेच्या निमित्ताने परिसरातील आणि संपूर्ण महाराष्ट्रातील तमाम योग शिक्षकांनी या उपक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन श्री श्री रविशंकर विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री आघाडे यांनी केले आहे. नियोजनासाठी विशेष परिश्रम हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश आहेर, विजय सूर्यवंशी यांच्यासह सराला बेट येथील विश्वस्त मधुकर महाराज सुरज महाराज, माऊली महाराज, साई महाराज आणि शिवाजी महाराज हे सर्वजण विशेष परिश्रम घेत आहेत.

या स्पर्धेमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शिबिरार्थींमध्ये उत्साहाचे वातावरण असून, अध्यात्म आणि आरोग्य यांचा एक सुरेख संगम या निमित्ताने सरला बेटावर पाहायला मिळत आहे. विश्वस्त मधुकर महाराज कडलग यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले

# देवगड येथे राधाकृष्णजी महाराज यांची श्रीमद भागवत कथा, तयारी सुरु

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** त्रैवार्षिक पुरुषोत्तम मासानिमित्त नेवासा तालुक्यातील भू लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या श्री गुरूदेव दत्त पीठ क्षेत्र देवगड येथे राजस्थान जोधपूर येथील गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून गुरुवार दि.२१ मे पासून श्रीमद भागवत कथा सोहळा सुरू होत आहे.राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वात होणाऱ्या श्रीमद भागवत कथा सोहळयाच्या निमित्ताने किर्तन महोत्सवाचे ही आयोजन करण्यात आले असून या सोहळयाची जय्यत तयारी देवगड येथे सुरू आहे.

सकाळी ९ ते १२ यावेळेत श्रीमद भागवत कथा होणार असून या निमित्ताने श्री दत्त लक्ष्मी नारायण याग देखील यज्ञ मंडपात होणार आहे.दुपारच्या सत्रात ३.३० ते ५ यावेळेत किर्तन महोत्सव साजरा होत असून यामध्ये देवगडचे विद्यार्थी गणेश महाराज तनपुरे, खलाल पिंपरी येथील शशिकांत महाराज कोरेकर, बहिरवाडी येथील रामनाथ महाराज पवार,लक्ष्मण महाराज नांगरे,आळंदी येथील सुदर्शन महाराज देशमुख यांची किर्तने होणार आहे.

बुधवार दि.२७ मे रोजी दिंडी मिरवणूक व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा यांचा पालखी सोहळा साजरा होणार असून गुरुवार दि.२८ मे रोजी राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या सकाळी ८ ते १० या वेळेत होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने श्रीमद भागवत कथा सोहळा व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे



श्री क्षेत्र देवगड येथे गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांच्या होणाऱ्या श्रीमद भागवत कथा श्रवणाचा व होणाऱ्या किर्तन महोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री दत्त मंदिर संस्थान देवगड व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# त्रिवेणी संगमाच्या विशेष मुहूर्तावर हजारो भाविकांचे शनि दर्शन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** येथील प्रसिद्ध असलेले श्री शनी मंदिर या मंदिरात राहू व केतू यांच्या पौराणिक मूर्ती असून पौराणिक आख्यायिकामध्ये राहू या ग्रहाचे शिर श्री शनी मंदिरात पडल्यामुळे या गावाचे नाव राहुरी पडले अशी आख्यायिका आहे. सुमारे १३ वर्षानंतर शनिवार श्री शनि अमावस्या व श्री शनि जन्मोत्सव हा एकत्रित सुवर्णयोग जुळून आल्यामुळे प्रसिद्ध असलेल्या या शनि मंदिरात हजारो भाविकांनी सकाळपासूनच रांगा लावून दर्शनाचा लाभ घेतला. श्री शनि महाराजांच्या साडेसातीला सर्वचजण घाबरतात त्यामुळे या मुहूर्तावर आपल्याला साडेसातीचा त्रास कमी व्हावा व आपल्याला त्यातून सुटका मिळावी या मागणीसाठी भाविक भक्तांनी मनोभावे श्री शनि महाराजांचे दर्शन घेतले यावेळी राज्यासह परराज्यातूनही भाविक भक्त दर्शनासाठी आले होते. यावेळी श्री शनी मंदिरावर मोठ्या



प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात आली होती व मंदिरात सुंदर अशी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

काल शनि जयंतीच्या निमित्ताने सकाळीच भाविकांनी प्रवरासंगम येथून कावडीने गंगेचे पाणी आणून श्री शनि महाराजांना जलाभिषेक करण्यात आला. श्री शनि महाराजांची महाआरती करण्यात आली. यावेळी राहुरीतील रवींद्र करपे व सुरेश देठ यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. दुपारी बारा वाजता श्री शनि महाराजांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. व दुपारी राहुरी नगरपरिषदेचे गटनेते हर्ष तनपुरे व राजेंद्र वाडेकर यांच्या हस्ते आरती संपन्न झाली व जन्मोत्सव फटाक्यांच्या आतषबाजीत साजरा करण्यात आला यावेळी भाविकांनी श्री शनैश्वर महाराजांच्या नावाचा जय घोष करीत श्री शनि महाराजांचे दर्शन घेतले. सायंकाळी सात वाजता एस.एस. ज्वेलर्सचे संचालक संजीव उदावंत यांच्या हस्ते आरती संपन्न झाली यावेळी भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

विशेष म्हणजे श्री शनी मंदिरात कुठलेही ट्रस्ट नाही ही सर्व सेवा सेवाभावी मित्र मंडळातर्फे केली जाते इथे कुणाचा आहे अंकुश नाही प्रत्येक जण आपापल्या भावनेप्रमाणे श्री शनि महाराजांची सेवा करत असतो. तरीही मंदिरातील सर्व व्यवस्था अतिशय चोखपणे बजावली जाते. हे या सेवाभावी मंडळाचे वैशिष्ट्य आहे. सकाळी सात वाजल्यापासून साबुदाणा खिचडीचा प्रसाद आलेल्या भाविक भक्तांना वाटण्यात आला. दररोज सकाळ संध्याकाळ विषयी महाराजांची ते नियमितपणे आरती संपन्न होत असते व शनिवारी महाआरती संपन्न होते. त्यावेळी ज्यांच्या हस्ते आरती संपन्न होते त्यांच्याच हाताने चिठ्ठी काढून ज्यांची नावे निघतील त्यांना पुढील शनिवारच्या आरतीचा मान दिला जातो.

# पद्मभूषण स्व. करमसीभाई सोमैयांचे जन्मस्थळी स्मारक उभारावे : राजेंद्र लांडगे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** साखर उद्योगात क्रांती करणारे पद्मभूषण स्व. करमसी सोमैया यांचा मालुंजे बु. सारख्या खेड्यात जन्म झाला. दरम्यान इंग्रज राजवटीचे सावट असतानाही इच्छाशक्ती आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर स्व. करमसी सोमैया यांनी खाजगी साखर उद्योगासह शैक्षणिक, आरोग्य,पर्यावरण, धार्मिक क्षेत्रात फार मोठे योगदान दिले आहे. याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने मरणोत्तर पद्मभूषण स्व. करमसीभाई सोमैया यांना जाहिर करून गौरविण्यात आले.स्व. सोमैया यांचे अलौकिक कार्याची नवीन पिढीला ओळख झाली पाहिजे. यासाठी जन्मस्थळी मालुंजे बु. येथे पद्मभूषण स्व. करमसीभाई सोमैया यांचे भव्य स्मारक उभारावे असे सामाजिक भावनेतून श्रीरामपूर जिल्हा संघर्ष समिती आणि पसायदान प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष राजेंद्र लांडगे प्रतिपादन केले.

पद्मभूषण स्व. करमसीभाई सोमैया यांचे भव्य स्मारक जन्मस्थळी होण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू असे मालुंजे बु. ग्रामपंचायत सरपंच अच्युत बडाख यांनी जाहिर केले. यावेळी सोसायटी चेअरमन नानासाहेब बडाख, जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब बडाख, ग्रामपंचायत सदस्य निवृत्ती बडाख, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब बडाख ह,भ,प, अमोल महाराज बडाख, सोपान बडाख, संजय बडाख, दत्तात्रय भालेकर, पांडुरंग रिंगे, पत्रकार आबासाहेब कुमावत, बाळासाहेब जाधव,वसंतराव बडाख,अंनत परदेशी, रघुनाथ राऊत बापूसाहेब जाधव, संपत जाधव,बाळासाहेब परदेशी, अर्जुन बडाख, मेजर जालींदर बडाख, वसंत बडाख, संपत जाधव, भास्कर बोऱ्हाडे, नरेंद्र रिंगे, भाऊसाहेब शिंदे,गणेश डावरे, राहुल काळे, पोपटराव बोरूडे गोरक्षनाथ बडाख, यशवंत बडाख,सचिन बडाख,सोपान भागवत बडाख, लक्ष्मण राऊत, अशोक बडाख, सर्जेराव भारस्कर, ठकसेन बर्डे, अशोक बडाख इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्तविकात राजेंद्र लांडगे म्हणाले, जसे कर्म भूमीला महत्व दिले जाते, त्याच तुलनेत जन्मभूमीला देखील महत्व दिले पाहिजे. स्व. सोमैया यांचे कार्य राज्यासह परराज्यात देखील सर्वश्रुत आहे. भारत देशातच अशा कर्तृत्वान व्यक्तींची मृत्यू नंतरही सामाजिक बांधिलकी जोपासली जाते. हाच आदर्श अंगीकृत करून

धावपळीच्या युगात प्रत्येक युवकांनी सामाजिक बांधिलकी जोपासण्याची आवश्यकता आहे. याच तत्वानुसार करोना काळापासून उदात्य भावनेतून पद्मभूषण स्व. करमसीभाई सोमैया यांचे मालुंजे बु. जन्मस्थळी जयंती अभिवादन कार्यक्रम करण्यास सुरुवात केली असल्याचे लांडगे यांनी शेवटी म्हटले आहे.

# जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाच्या जोरावरच यश तुमच्या पायाशी लोळण घेईल : आमदार आशुतोष काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** शिक्षण हे केवळ गुण मिळवण्याचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची आणि उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारी प्रभावी शक्ती आहे. जीवनात मोठे ध्येय गाठायचे असेल तर सातत्यपूर्ण प्रयत्न, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास अत्यंत महत्वाचा असून जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावरच यश तुमच्या पायाशी लोळण घेईल असा बहुमोल सल्ला आमदार आशुतोष काळे यांनी ईयत्ता १० वी १२ वीच्या गुणवंतांना दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, कोपरगाव यांच्या वतीने कलश मंगल कार्यालय येथे कोपरगाव मतदार संघातील ईयत्ता दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य 'गुणगौरव सोहळा' रविवार (दि.१७) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या शुभहस्ते सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडल्यास त्यांना भविष्यात अजून यशाची मोठी शिखरे सर करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या वतीने आवर्जून ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. आजचा हा गौरव केवळ विद्यार्थ्यांचा नाही तर त्यांना अनमोल मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचा आणि त्यांच्या यशामागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या पालकांचा देखील आहे.आजची तरुण पिढी हेच उद्याचे भविष्य असून विद्यार्थ्यांनी केवळ पद आणि संपत्ती मिळवण्यासाठी नाही तर देशाच्या उभारणीसाठी आपल्या ज्ञानातून काय योगदान देवू शकतो याचा विचार केला पाहिजे. पुढील शिक्षण घेताना नवीन सवंगडी निवडतांना योग्य व्यक्तीची निवड करा. तुम्हीं मिळविलेल्या यशातून आपल्या गावाचा, तालुक्याचा आणि जिल्ह्याचा अभिमान वाढला पाहिजे याची जाणीव ठेवा. मोठे व्हा, पण आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवा असे सांगितले. यावेळी सुप्रसिद्ध हास्य कवी यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि, हे स्पर्धेचे युग आहे शिक्षण आणि पदव्या




मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे अनेक आवाहन आहेत. त्यमुळे मिळविलेल्या पदवीबरोबरच स्वतःच्या अंगी असलेली कला जोपासा त्या कलेचा तुमचे भविष्य उज्वल करण्यासाठी निश्चितपणे मदत होईल. मराठी भाषा हि जगात सगळ्यात चांगली भाषा आहे. हि भाषा जपण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांवर आहे. बाहेरच्या देशात राहणारी मराठी माणस मराठी अस्मिता जपत आहे. याचा खूप अभिमान वाटतो. आयुष्यात पहिल्यांदा गोदामाईच्या कुशीत वसलेल्या कोपरगाव नगरीत आलो. विविधतेने नटलेले हे गाव अतिशय समृद्ध आहे. कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांना देखील भेटल्याच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. आमदार आशुतोष काळे अतिशय शांत आणि सोज्वळ आणि राजबिंड व्यक्तिमत्व आहे. ते आवर्जून गुणवंतांचा सत्कार करतात हि अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे. कार्यक्रमाची गर्दी बघून मराठीपणाचा अभिमान वाटत असून हीच खरी महाराष्ट्राची संस्कृती असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, ज्ञानदेव मांजरे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रविण शिंदे, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, गौतम बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव रक्ताटे, कारखान्याचे संचालक दिलीपराव बोरनारे, सचिन चांदगुडे, शंकरराव चव्हाण, श्रीराम राजेभोसले, दिनार कुदळे, प्रशांत घुले, सुनिल मांजरे, वसंतराव आभाळे, विष्णू शिंदे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, जिनिंग व प्रेसिंगचे संचालक शिवाजीराव शेळके, महेश लोंढे, गौतम बँकेचे संचालक शिरीष लोहकणे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, डॉ. चंद्रशेखर आव्हाड, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष शशिकांत देवकर, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, जनार्दन कदम, सोमेश आढाव, संदिप कपिले, विजय त्रिभुवन, राहुल शिरसाठ, वाल्मिक लहिरे, सोमनाथ आढाव, सुनिल शिलेदार आदींसह कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गुणवंत विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# माका येथील लाडक्या बहिणींच्या मेळाव्याला हजारो भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## १३ ग्रामसंघांना ४८ लाखांच्या धनादेशाचे वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री


**नेवासा** : तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या संकल्पनेतुन नेवासा तालुक्यातील लाडक्या बहिणींचे विविध प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने तालुक्यातील माका येथील मंकादेवी मंदिर सभागृहात रत्नमालाताई लंघे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लाडक्या बहिणींच्या महिला मेळाव्याला हजारो महिला भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी १३ ग्रामसंघांना रत्नमालाताई लंघे यांच्या हस्ते ४८ लाखांच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) पंचायत समिती नेवासा यांच्या माध्यमातून ज्ञानेश्वरी महिला प्रभाग संघ चांदा अंतर्गत सावित्रीबाई फुले महिला ग्राम संघ माका या कार्यालयाचे उद्घाटन तसेच महिला मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी झालेल्या महिलांच्या मेळाव्याला माका गावच्या सरपंच विजयाताई पटेकर,उपसरपंच अनिल घुले,संजय गांधी निराधार योजनेचे मार्गदर्शक राजेंद्र निंबाळकर,तालुका अभियान व्यवस्थापक अर्जुन सोनवणे,कुकाणा प्रभाग समन्वयक ज्ञानेश्वर कांबळे, आर्थिक साक्षरता समन्वयक रविंद्र काळे आयोजक सुजाता किर्तीशाही,बांधकाम कामगार विभागाचे अमोल दिघे, सहदेव लोंढे,मच्छिंद्र मुंगसे, सोपान शेंडगे,किरण शिंदे,बाळासाहेब शिरसागर, सचिन देवकाते,आदिनाथ शेंडगे,बारकु खेमनर,मनोज गवांदे,कृष्णा सानप,तालुका व्यवस्थापक सौ.ऐश्वर्या देशमुख,प्रभाग समन्वयक कुकाणा,बेल पिंपळगाव,सोनई,खरवंडी,भेंडा येथील प्रभाग समन्वयक व्यासपीठावर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून महिलांच्या मेळाव्याला सुरुवात करण्यात आली. मेळावा संयोजक संभाजीराजे लोंढे यांनी आलेल्या लाडक्या बहिणींचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

नवीन रेशन कार्ड बनवणे,नाव कमी करणे,रेशन कार्ड मध्ये नाव समाविष्ट करणे,रेशन कार्ड मधील नावे ऑनलाईन करणे,डोलसह वृद्ध पेन्शन प्लॅन, विधवा महिला निराधार योजना, श्रावण बाळ योजना, अपंग लाभ,भजनी मंडळ लाभ या विविध योजनांची माहिती राजेंद्र निंबाळकर यांनी दिली.अर्जुन सोनवणे यांनी बचत गट उत्कर्षासाठी मोलाची माहिती दिली. रविंद्र काळे यांनी आर्थिक साक्षरतेविषयी प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले.

अमोल दिघे यांनी बांधकाम कामगार योजनेच्या संदर्भात माहिती देऊन बांधकाम कामगारांना न्याय कसा मिळेल यासाठी प्रयत्न व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रसंगी बोलतांना सौ.रत्नमालाताई लंघे म्हणाल्या की बचत गटांना मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध होते ते घेऊन बचत गटांच्या माध्यमातून उद्योजक बनण्याचे ध्येय ठेवा,सचोटीने व्यवहार करून कर्ज वेळेवर फेडून पत निर्माण करा,नेवासा तालुक्याचे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्पर राहू ते आमचे आद्य कर्तव्यच आहे,आमच्या हाकेला ओ देऊन आपण हजारोंच्या संख्येने मेळाव्याला उपस्थित राहिलात त्याबद्दल त्यांनी महिला भगिणींना धन्यवाद दिले यावेळी तेरा ग्राम संघांना मंजूर झालेल्या ४८ लाख ३० हजाराच्या धनादेशाचे वितरण व सर्व ग्राम संघातील महिला पदाधिकाऱ्यांचा सन्मान सौ. रत्नमाला ताई लंघे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी भ्रमणध्वनीवरून लाडक्या बहिनींशी मेळाव्याच्या निमित्ताने संवाद साधून शुभेच्छा दिल्या.आपले प्रश्न सोडविण्यासाठी हा लाडका भाऊ आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे असे सांगून मेळाव्याला शुभेच्छा दिल्या. सदर महिला मेळाव्याच्या प्रसंगी विविध योजनांची अंमलबजावणी म्हणून उभारण्यात आलेल्या स्टॉलद्वारे विविध योजनांचे फॉर्म भरून घेण्यात आले.यासाठी कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात आली.लागणाऱ्या कागदपत्राविषयी मार्गदर्शन ही करण्यात आले.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर सहदेव लोंढे यांनी उपस्थित महिला भगिनींचे व मान्यवरांचे आभार मानले.




नेवासा तालुक्यातील माका येथे झालेल्या महिलांच्या मेळाव्यात ग्राम संघांना मंजूर झालेल्या धनादेशाचे वाटप करतांना सौ. रत्नमालाताई लंघे पाटील समवेत उपस्थित ग्रामसंघाच्या पदाधिकारी दिसत आहे. **(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

# गगनगिरी महाराज सप्ताहासाठी निळवंडे कालव्यातून महाळुंगीत पाणी सोडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील गुंजाळवाडी येथे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या प.पू. स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहासाठी पिण्याच्या तसेच इतर आवश्यक वापरासाठी पाण्याची उपलब्धता व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केली होती. या मागणीची तातडीने दखल घेत आमदार खताळ यांनी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला.

त्यानंतर जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना पाणी सोडण्याचे निर्देश देण्यात आले असून शनिवारी सायंकाळी निळवंडे डाव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले. त्यामुळे परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुंजाळवाडी येथे अधिक मासानिमित्त प.पू. स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ९ जून ते १५ जून या कालावधीत करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविक उपस्थित राहणार असल्याने पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासणार आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामस्थांनी म्हाळुंगी नदीवरील केटी वेअरमध्ये पाणी सोडण्याची मागणी आमदार. खताळ यांच्याकडे केली होती.



ग्रामस्थांच्या भावना व धार्मिक कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी ही मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमोर मांडली. मंत्री विखे पाटील यांनीही या सामाजिक व धार्मिक उपक्रमाचे महत्त्व ओळखून जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ पाणी सोडण्याचे निर्देश दिले.

त्यांच्या आदेशानुसार निळवंडे डाव्या कालव्यातून गुंजाळवाडी येथील म्हाळुंगी नदीपात्रातील केटी वेअरमध्ये पाणी सोडण्यात आले आहे.या निर्णयामुळे गुंजाळवाडी, वेल्हाळे, राजापूर आदी परिसरातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत आमदार अमोल खताळ आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

# मल्हारवाडी रोडवरील पक्की अतिक्रमणे काढा : साळवे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**राहुरी** : शहरात दिवसेंदिवस वाढत असलेले अतिक्रमण सर्व सामान्य नागरिकांच्या जीवावर बेतत आहे. मल्हारवाडी रोड परिसरात महिला मर्चंट नागरी सहकारी पतसंस्थे समोरील अतिक्रमणामुळे दि. १६ मे रोजी दुपारच्या दरम्यान एका तरुणाचा अपघात झाला. सुदैवाने तो तरुण बचावला. राहुरी शहरातील मल्हारवाडी रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर पक्के अतिक्रमण झाले झाले.

त्यामुळे रस्ता अरुंद होऊन छोटे मोठे अपघात होत आहेत. महिला मर्चंट नागरी सहकारी पतसंस्थे समोर रस्त्यावर साखळी लावलेले लोखंडी पोल उभे केले आहेत. परिसरातील नागरिकांनी संबंधित अतिक्रमण धारकाला वारंवार सांगुन देखील त्यांनी अतिक्रमण काढले नाही. दि. १६ मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजे दरम्यान विनोद निशिगंध हा तरुण रस्त्याने जात असताना रस्त्यावर लावलेल्या साखळीमध्ये पाय गुतून तो रस्त्यावर पडला. सुदैवाने त्याचा जीव वाचला. संतप्त झालेल्या नागरिकांनी अतिक्रमण असलेले लोखंडी पोल तोडुन काढले. तसेच नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण धारकावर कारवाई करावी, अशी मागणी केली. राहुरी शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. मोठ मोठ्या इमारती अतिक्रमणामध्ये आहेत. काही नवीन इमारती अतिक्रमणात आहेत. अतिक्रमणाची कारवाई फक्त गोर गरीब व छोट्या दुकानदारांवर होते. धन दांडग्यांचे अतिक्रमण काढण्यास नगरपरिषद धजावत नाही.

असा आरोप वंचितचे जिल्हा संपर्क प्रमुख पिंटूनाना साळवे यांनी केला. तसेच शहरातील पक्के अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे, अन्यथा वंचितच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडले जाईल असा इशारा पिंटूनाना साळवे यांनी दिला. यावेळी आरपीआयचे तालूका उपाध्यक्ष सुनील चांदणे, नवीन साळवे, तथागत रोकडे, डॉ. प्रमोद निशिगंध, विनोद निशिगंध, सागर साळवे, रोहन शिंदे, जॉन साळवे, मनोज पाटोळे, पगारे सर, सातपूते सर आदिंसह अनेक नागरीक उपस्थित होते.

# पठार भागातील विकासनिधीवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : साकुर पठार भागातील विविध विकासकामांच्या निधीवरून राजकीय वातावरण तापले असून, माजी जिल्हा परिषद सभापती सौ. मीराताई शेटे यांनी नवीन लोकप्रतिनिधींवर जोरदार टीका केली आहे. साकुर ते बिरेवाडी तसेच रणखांबवाडी ते दिग्रस या रस्त्यांसाठी मंजूर झालेला निधी हा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळातील असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

बिरेवाडी येथे पालकमंत्री व नवीन लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते पार पडलेल्या भूमिपूजन कार्यक्रमानंतर सौ. शेटे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, दिग्रस ते रणखांबवाडी रस्त्याचे काम हे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या २५-१५ निधीतून मंजूर झाले होते. तसेच साकुर ते बिरेवाडी आणि तासकरवाडी ते खंडेरायवाडी या सुमारे १७ कोटी रुपयांच्या रस्त्यांसाठीही ऑक्टोबर २०२४ पूर्वी मंजुरी मिळाली होती. या कामांसाठी मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून, यशोधन कार्यालय व इंद्रजीत भाऊ थोरात यांचे मोठे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित मंजुरीचे सर्व पुरावे आपल्याकडे असल्याचाही दावा त्यांनी केला. नवीन लोकप्रतिनिधींनी गेल्या दीड वर्षांत एक रुपयाचाही नवीन निधी आणलेला नाही, असा आरोप करताना शेटे म्हणाल्या की, उलट पूर्वी मंजूर झालेली काही कामे रद्द करण्यात आली. नवीन निधी आणून विकासकामांचे उद्घाटन करावे, मात्र पूर्वी मंजूर झालेल्या कामांचे श्रेय घेऊ नये, असे आवाहन त्यांनी केले. तालुक्यावर बाह्य शक्तींचा प्रभाव असल्याचा आरोप करत त्यांनी नवीन लोकप्रतिनिधी स्वतःहून निर्णय घेऊ शकत नसल्याची टीकाही केली. आम्ही मंजूर करून आणलेल्या निधीवर आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचे काम थांबवावे, असा इशाराही मीराताई शेटे यांनी दिला.

# पुणतांबा येथील त्रिदिनी हरिनाम सप्ताहाला भाविकांचा प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पुणतांबा** : येथील योगीराज चांगदेव महाराज समाधी परिसरात असलेल्या योगीराज गंगागिरी महाराज यांच्या आश्रमात कालपासून सुरु झालेल्या त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह व गुरुचरित्र पारायणास मोठया उत्साहात व भक्तिभावाने सकाळी ८.३० वाजता विविधत सुरुवात झाली आश्रमाचे महंत विजयानंदगिरी महाराज व भोला उदावंत सह असंख्य भाविकांनी सर्वांच्या साक्षीने पारायण सोहळ्याची सुरुवात केली पारायण सोहळ्यात जनार्धन महाराज जोशी यांनी स्वतः स्टेशजी जबाबदारी सांभाळून उपस्थित १००पेक्षा जास्त भाविकांना पारायणाबाबदमार्गदर्शन केले विशेष म्हणजे कालपासून आदिक मास सुरु झाल्यामुळे हया पारायण महोत्सवात सहभागी झालेले भाविक व मान्यवरांना काल पुरणपोळी व आमरसाचा जेवण म्हणून प्रसाद देण्यात आला. गेल्या ३ वर्षात ह्या आश्रमात आयोजित केलेल्या अशा कार्यक्रमात भाविकांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविल्याबद्दल भाविकामध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# डॉ. आंबेडकरांनी महिलांना समान अधिकार दिले : त्रिभुवन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : रिपब्लिकन सेना महिला आघाडीच्या रासकरनगर शाखेचे उद्घाटन शिर्डी लोकसभा अध्यक्ष चरण त्रिभुवन यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी महिलांना मार्गदर्शन करताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना समान अधिकार देऊन त्यांना पुरुषांच्या बरोबरीला आणल्याचे सांगितले. त्रिभुवन म्हणाले, इंग्लंड व अमेरिका यांसारख्या देशांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी शंभर वर्षे संघर्ष करावा लागला. मात्र भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणतेही आंदोलन न होता महिलांना मतदानाचा अधिकार, नोकरीत समान संधी, समान वेतन तसेच प्रसूती रजेचा अधिकार दिला. महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी राज्यघटनेत अनेक कायदे करण्यात आल्यामुळे आजची महिला सक्षम झाल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी रिपब्लिकन सेनेचे प्रवक्ते शिवा साठे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष दर्शनाताई काळे, तालुकाध्यक्ष नवनाथ घोडेकर, महिला आघाडी तालुकाध्यक्ष सनाताई पठाण, शहराध्यक्ष बाबाभाई शेख, मीडिया प्रमुख साई साठे, यश काळे आदी उपस्थित होते.

# उसाचे क्षेत्र व एकरी उत्पादन वाढवा : बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : दूध व ऊस ही शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न देणारी पिके आहेत. सध्याच्या वाढत्या स्पर्धेच्या काळात उसाचे क्षेत्र वाढवण्याबरोबरच एकरी १०० टन उत्पादन घेण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे.

तसेच तालुक्याला हक्काचे पाणी आणि रोटेशन काळात ११ तास वीज मिळालीच पाहिजे, अशी मागणी माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली. जोर्वे येथील शिव ओंकार लॉन्स येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आयोजित ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग, मृदा शास्त्रज्ञ डॉ. अभिनंदन पाटील, पांडुरंग घुले, इंद्रजीत थोरात यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. थोरात म्हणाले की, केंद्र सरकारने साखर निर्यात थांबवल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. खाजगी साखर कारखान्यांची संख्या वाढल्याने स्पर्धाही तीव्र झाली आहे.

मात्र आपल्या कारखान्याने अल्कोहोल निर्मिती, वीज उत्पादन व काटकसरीच्या माध्यमातून चांगली वाटचाल कायम ठेवली आहे. दुष्काळी भागासाठी निळवंडे धरण व कालव्यांची कामे पूर्ण करण्यात आली असून डावा व उजवा कालवा सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले. रोटेशन सुरू असताना शेतकऱ्यांना केवळ पाच ते सहा तास वीज मिळत आहे. न्यायालयाने ११ तास वीज देण्याचा निर्णय दिला असतानाही त्याची अंमलबजावणी होत नाही. यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. डॉ. अशोक कडलग यांनी माती परीक्षण, सेंद्रिय खतांचा वापर व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एकरी उत्पादन वाढवण्याचे मार्गदर्शन केले. तर डॉ. अभिनंदन पाटील यांनी ठिबक सिंचन, गांडूळ खत व मृदा व्यवस्थापनाविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले, तर उपाध्यक्ष पांडुरंग घुले यांनी आभार मानले. मेळाव्यास शेतकरी, सभासद, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### एकरी १०० टन उत्पादन हे उद्दिष्ट

थोरात सह साखर कारखान्यावर सभासद, शेतकरी आणि कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादकांचाही मोठा विश्वास आहे. आपण सातत्याने चांगला भाव दिला असून ऊस उत्पादकांचे हित जपले आहे. आगामी काळामध्ये आपल्या कार्यक्षेत्रात ऊस क्षेत्र वाढवण्याबरोबर एकरी १०० टन उत्पादन झाले पाहिजे याकरता १०० टन ऊस उत्पादन हे प्रत्येक शेतकऱ्याचे उद्दिष्ट असले पाहिजे याकरता कारखान्याच्या कृषी व ऊस विकास विभागाची मदत होईल असे कारखान्याचे मार्गदर्शक माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले आहे.

## द•ख•ल

### प्रमोद पंडित यांचा ना. रामदास आठवले यांच्या हस्ते सत्कार




**कोल्हार** : राहाता तालुक्यातील पाथरे बुद्रुक येथील सिने कलावंत प्रमोद भाऊसाहेब पंडित यांना नाशिक येथे कलावंत विचार मंच कमल फिल्म प्रोडक्शन आणि कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा उत्कृष्ट कलावंताचा पुरस्कार मिळाल्याबद्दल केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांच्या हस्ते प्रमोद पंडित यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुरस्कार वितरण कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष सुनील मोंढे ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे अभिनेत्री दिपाली कुलकर्णी प्राध्यापक सोमनाथ मोठाळ कवयित्री सुनिता वाळुंज आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### तांबोळ विद्यालयाचा सलग चौथ्यांदा १००% निकाल




**गणोरे** : अगस्ती रूलर एज्युकेशन सोसायटीचे तांभोळ येथील तुळजाभवानी विद्यालयचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा सलग चौथ्या वर्षी शंभर टक्के लागला आहे. या परीक्षेत कुमारी दिव्या सुभाष जाधव हिने ८६.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे त्याचप्रमाणे कुमारी स्नेहा संतोष माने ८४.६० द्वितीय क्रमांक तर राजवर्धन सुरेश दोरगे यांनी ७२.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच सपना अनिल उघडे हिने ७२.६० टक्के चतुर्थ, प्रेमराज युवराज चव्हाण यांनी ६६.२० टक्के गुण मिळून पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे. गुणवत्तेच्या यादीत विद्यालयाने आपली मान उंच ठेवली आहे.

या यशामुळे विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक कोळपकर, सुनील भोर, कुंडलिक काळे, बाचकर मॅडम यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. मार्गदर्शक शिक्षक, गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट वसंतराव मानकर, सचिव मंगेश नवले, सरपंच जयश्री माने सर्व सदस्य व व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश दोरगे तज्ञ मार्गदर्शक सुधाकर हरणामे ग्रामस्थ यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले आहे.

### माळवडगावला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

**माळवाडगाव** : येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात जगदंबा युवा प्रतिष्ठानच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला जगदंबा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सतीश आसने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी माळवाडगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सचिव प्रदीप आसने यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

उपस्थितांनी घोषणाबाजी करत महाराजांना अभिवादन केले. या प्रसंगी जगदंबा युवा प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक पत्रकार संदीप आसने, उपाध्यक्ष आतिश आसने, संघटक विठ्ठल आसने, देवराज आसने, तेजस आसने, शोएब पठाण, कार्तिक आसने यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून युवकांमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांप्रती प्रेरणा निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा : ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक




**चांदा** : ज्या कुटुंबाला आई-वडिलांचे आशीर्वाद लाभतात, त्या कुटुंबावर देवदैवतांचीही कृपा राहते. मातृ-पितृ सेवा हीच खरी ईश्वरसेवा असून, आई-वडिलांची सेवा करणाऱ्यांना जीवनात योग्य मार्ग सापडतो, असे प्रतिपादन ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांनी केले. म्हाळस पिंपळगाव येथे रखमाबाई व शहादेव जगन्नाथ ठोंबरे यांच्या मातृ-पितृ पूजन कार्यक्रमानिमित्त आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होते.

यावेळी ठोंबरे दाम्पत्यांचा गुलाब पुष्पहार, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन ठोंबरे परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. किर्तनात मार्गदर्शन करताना उद्धव महाराज मंडलिक म्हणाले की, आई-वडिलांचा सन्मान व सेवा करणाऱ्यांचे जीवन सुखकर होते. मात्र ज्यांनी आई-वडिलांना विसरले, त्यांना जीवनात अनेक संकटांना सामोरे जावे लागते. वृद्ध आई-वडिलांची सेवा करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. अशी सेवा वारंवार करण्याची संधी मिळत नाही.

ठोंबरे परिवाराने केलेला मातृ-पितृ पूजनाचा आदर्श समाजाने घ्यावा. या कार्यक्रमास ह.भ.प. कारभारी महाराज, तनपुरे महाराज, पवार महाराज यांच्यासह धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप कर्डीले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ठोंबरे बंधूंनी मानले.

# पान १ वरुन

## कल्याण रेल्वे स्थानकात ट्रेनची वाट पाहणाऱ्या अहिल्यानगरच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

फोन हिसकावून घेतला. मुलीने जेव्हा मोबाईल परत मागितला तेव्हा सौरभ याने, 'मोबाईल पाहिजे असेल तर माझ्यासोबत पोलीस स्टेशनमध्ये चल', असे सांगितले. यानंतर सौरभ सोनावणे या मुलीला कल्याण रेल्वे यार्डात घेऊन गेला. याठिकाणी सौरभने या मुलीवर लैंगिक अत्याचार केला. मात्र, मुलीने कशीबशी त्याच्या तावडीतून सुटका करत रेल्वे पोलीस ठाणे गाठले. तिने पोलीस ठाण्यात शिरताच सारा प्रकार सांगितला. हा सगळा प्रकार ऐकताच लोहमार्ग पोलिसांना तातडीने तपासाला सुरुवात केली. पोलिसांनी कल्याण रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज तपासून सौरभ सोनावणे याला शोधून काढले. कल्याण सारख्या बहुतांश वेळ गजबजलेल्या रेल्वे स्थानकात ही घटना घडली आणि कोणालाही त्याचा थांगपत्ता लागला नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तसेच या सगळ्या प्रकारामुळे रेल्वे पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या सगळ्यानंतर आता रेल्वे पोलीस आणि सरकार काय बोलणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना पदावरुन हटवा : राहुल गांधी

खासदार राहुलगांधी यांनी नीट पेपरफुटीवरून केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. वारंवार परीक्षेचे पेपर का फुटत आहेत? असा सवाल राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना विचारला आहे. हे सगळं होत असताना अद्याप शिक्षणमंत्र्यांना बडतर्फ का करण्यात आलं नाही असेही राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी सातत्याने नीट पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित करत आहेत. त्यांनी केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.२०२४ आणि २०२६ च्या नीट पेपरफुटीचा संदर्भ देत राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, २०२४ मध्ये नीट पेपरफुटी झाली होती, परंतु परीक्षा रद्द झाली नाही किंवा कोणत्याही मंत्र्याने राजीनामा दिला नाही. त्यावेळी या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला होता आणि एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्यांनी पुढे म्हटले की, २०२६ मध्ये पुन्हा नीट पेपरफुटी झाली. यावेळी परीक्षा रद्द करण्यात आली, परंतु शिक्षणमंत्र्यांनी अद्याप राजीनामा दिलेला नाही.

## मित्र-मैत्रिणीला भोंदूबाबाने संपवले!

कबुली दिली. जयश्रीचे काका संजय हिरे यांनी निजामपूर पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार आणि प्राथमिक तपासातील माहितीनुसार, जयश्री आणि अक्षय हे दोघे शनी अमावस्येच्या रात्री विशेष पूजेसाठी भोंदू बाबा योगेश खैरनार याच्या आश्रमात गेले होते. तेथे पूजाविधी सुरू असताना त्यांच्यात काही कारणावरून जोरदार वाद झाला. यानंतर भोंदू बाबाने संतप्त होऊन अक्षयच्या डोक्यात लोखंडी वस्तूने जबर वार करून त्याला संपवले. तर जयश्रीचा ओढणीने गळा आवळून तिचा जीव घेतला. अटक टाळण्यासाठी या भोंदू बाबाने पोलिसांची दिशाभूल करण्याचा एक अजब बनाव रचला होता. जयश्रीला दुसराच एक जण मारत होता, मी तिला वाचवायला गेलो आणि त्या झटापटीत माझ्या हातून त्या तरुणाचा जीव घेतला गेला, असे त्याने पोलिसांना सांगितले. मात्र, पोलिसी चौकशीत हा खोटा पाढा टिकला नाही. त्याने अक्षयचा मृतदेह आश्रमाजवळ उभांरडी येथील वनक्षेत्रात (शिवारात) नेऊन पुरल्याचे कबूल केले. धक्कादायक बाब म्हणजे, मृतदेह वाहून नेण्यासाठी त्याने बैलगाडीचा वापर केला होता, ज्याच्या चाकांचे निशाण जमिनीवर आढळून आले आहेत. पोलिसांनी तात्काळ उंबरांडी शिवारातून अक्षयचा मृतदेह ताब्यात घेतला. या प्रकरणी आरोपी भोंदू बाबा योगेश खैरनार याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून पुढील तपास सुरु आहे.

# निळवंडेचे आवर्तन सुरळीतपणे सुरु, सर्व पाझर तलाव साठवण बंधारे भरुन द्या ; आ. काळेंची पालकमंत्र्याकडे मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** निळवंडे कालव्यांना आवर्तन सोडण्यात आले असून कोपरगाव तालुक्यात तळेगाव शाखा कालव्यातून वडझरी पॉइंट, बोडखेवाडी पॉइंट व शेख वस्ती पॉइंटमधून आवर्तन सुरळीतपणे सुरु आहे. त्यामुळे जिरायती भागातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. निळवंडेचे पाणी अंजनापूर गावापर्यंत पाणी आले आहे. वडझिर पॉइंट मधून डांगेवाडी बंधाऱ्यात पाणी सुरु आहे ते पुढे वेस, सोयगाव, बहादराबाद पर्यंत येणार आहे.त्यामुळे सुरु असलेल्या आवर्तनातून कोपरगाव मतदार संघातील सर्व पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरून देण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दयाव्यात अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्याकडे टंचाई आढावा बैठकीत केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई व मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक संपन्न झाली या बैठकीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील इतर लोकप्रतिनिधींबरोबरच आमदार आशुतोष काळे हे देखील दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले की, चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात असली तरी गोदावरी कालव्यांचे तसेच निळवंडेचे आवर्तन सुरु असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अडचणी नाही. जिरायती भागातील नागरिकांना निळवंडे आवर्तनाचा मोठा लाभ झाला आहे. परंतु हवामान विभागाने चालू वर्षी पर्जन्यमान कमी होणार असल्याचा अंदाज वर्तवला असून पाऊस सुरु होण्यास अजून अवधी आहे.

त्यामुळे सुरु असलेल्या निळवंडेच्या आवर्तनातून कोपरगाव मतदार संघाच्या जिरायती भागातील सर्व पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरल्यास जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत अडचणी येणार नाहीत. त्यामुळे सुरु असलेल्या आवर्तनातून पाझर तलाव, बंधारे, गावतळे भरून देण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाला दयाव्यात या आमदार आशुतोष काळे यांच्या मागणीला राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. त्यामुळे कोपरगाव



मतदार संघाच्या जिरायती भागातील नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

# शिरूरमध्ये शनी जयंती उत्सवाचा भक्तिमय जल्लोष

### १३ हजार भाविकांनी घेतले शनिदेवांचे दर्शन, रवी गोसावी यांच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर शहरातील लाटे आळी रोड परिसरात घोडनदीच्या काठावर वसलेल्या जागृत शनिमंदिरात शनी जयंती आणि शनी अमावस्येच्या दुग्धशर्करा योगानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक उत्सवाला भाविकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. शनिवारी पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शिरूर शहरासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी शनिदेवांच्या दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती. शनिदेवांच्या जयघोषाने आणि धार्मिक वातावरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

मंदिर व्यवस्थापक रवी गोसावी यांनी गेल्या दोन दिवसांपासून अहोरात्र मेहनत घेत संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध आयोजन केले होते. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दर्शनासाठी स्वतंत्र रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उन्हापासून संरक्षणासाठी सावलीची सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी विशेष सोय करण्यात आली होती. त्यामुळे एवढ्या मोठ्या गर्दीतही कुठेही गोंधळ निर्माण झाला नाही आणि सर्व भाविकांना शांततेत व सुलभ पद्धतीने शनिदेवांचे दर्शन



घेता आले.

शनिवार, १६ मे रोजी सकाळी ठीक ८ वाजता मंदिरात मुख्य महाआरती अत्यंत भक्तिभावाने संपन्न झाली. महाआरतीनंतर भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. शनिदेवांच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांनी तेल अभिषेक, पूजा-अर्चा तसेच नवस फेडण्यासाठी मंदिरात उपस्थिती लावली होती. मंदिर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार सकाळपासून दुपारी ४ वाजेपर्यंत तब्बल १३ हजार भाविकांनी शनिदेवांचे दर्शन घेत पुण्यलाभ मिळवला.

उन्हाचा कडाका आणि वाढती गर्दी लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने अत्यंत चोख व्यवस्था केली होती. स्वयंसेवकांनी भाविकांना वेळोवेळी मार्गदर्शन करत शिस्त राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रम, मंत्रोच्चार आणि भक्तीमय वातावरणामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत होता.

दोन दिवसीय उत्सवाच्या निमित्ताने रविवार, १७ मे २०२६ रोजी मंदिरात भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हा महाप्रसाद कार्यक्रम होणार असून अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर व्यवस्थापनातर्फे करण्यात आले आहे.

या संपूर्ण उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी काका भोसले, सचिन गरुडे, सुनील जठार, राजेंद्र घोडके, अविनाश जाधव, सुशांत कुटे, शांतनू कोळपे, आर्यन गायकवाड, तेजस ताक, ओम जाधव आणि अदनान सय्यद यांनी विशेष परिश्रम घेत मोलाचे सहकार्य केले.

# इंधन बचतीसाठी महावितरणचे विद्युत वाहनांकडे पाऊल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई/ पुणे :** पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन बचतीसाठी पेट्रोल व डिझेलऐवजी विद्युत वाहनांचा वापर करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत महावितरणने आपल्या प्रशासकीय वापरातील वाहनांसाठी विद्युत वाहनांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ईव्ही वाहनांचा वापर सुरू केला आहे.

राज्य शासनाच्या विद्युत वाहन धोरण २०२५ अन्वये महावितरणकडून टप्प्याटप्प्याने पेट्रोल आणि डिझेल वाहनांच्या जागी विद्युत वाहनांचा समावेश करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात मुख्य व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विद्युत वाहन खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी यापूर्वीच विद्युत वाहनांचा वापर सुरू केला होता. गेल्या आठवड्यात आणखी दहा विद्युत वाहने महावितरणच्या ताफ्यात दाखल झाली असून प्रादेशिक विभागांचे सहव्यवस्थापकीय संचालक तसेच कार्यकारी संचालकांनी त्यांचा वापर सुरू केला आहे.

गुरुवारी उपलब्ध झालेल्या नव्या विद्युत वाहनांचा संचालन/प्रकल्प संचालक सचिन तालेवार, वित्त संचालक अनुदीप दिघे, वाणिज्य संचालक योगेश गडकरी आणि मानव संसाधन संचालक राजेंद्र पवार यांनी तात्काळ वापर सुरू केला.इंधन बचतीसाठी करण्यात आलेल्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर उर्वरित विद्युत वाहनांची उपलब्धता लवकर व्हावी यासाठी महावितरणकडून विशेष पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानंतर ही वाहने उपलब्ध झाली असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वापरात आणण्यात आली आहेत.

महावितरण अंतर्गत सर्व मुख्य अभियंता, क्षेत्रीय अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उपविभागीय अभियंता कार्यालयांमध्ये देखील पेट्रोल व डिझेल वाहनांऐवजी विद्युत वाहनांचा वापर करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे.



# कुटुंबाकडूनच होणारे अत्याचार वेदनादायी; वस्त्यांमध्ये प्रबोधन आवश्यक - डॉ. नीलम गोऱ्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुण्यातील लोहगाव आणि येवलेवाडी परिसरात अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार व विनयभंगाच्या घटनांची शिवसेना नेत्या तथा मा.उपसभापती विधानपरिषद आ.डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी तात्काळ दोन्ही पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांशी संपर्क साधून घटनेची माहिती घेतली आणि आरोपींवर कडक कारवाईचे निर्देश दिले.

येवलेवाडी येथील घटनेत ९ वर्षीय मुलीवर तिच्या चुलत आजोबानेच अत्याचार केल्याचे समोर आले आहे. यावर तीव्र दुःख व्यक्त करताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ''स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तींकडूनच असे अत्याचार होत असल्याबद्दल अतिशय खंत वाटत आहे. अशा घटना रोखण्यासाठी संबंधित वस्त्यांमधील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर समुपदेशन आणि प्रबोधन करणे अत्यंत आवश्यक आहे.'' वस्त्यांमध्ये सुरक्षिततेचे वातावरण तयार करण्यासाठी आणि प्रबोधनासाठी स्थानिक पोलीस ठाण्यांमधील 'महिला दक्षता समित्या' तातडीने सक्रिय कराव्यात. पीडित कुटुंब मूळचे नेपाळचे असले, तरी त्यांना शासनाच्या 'मनोधैर्य योजने'च्या माध्यमातून आर्थिक व मानसिक मदत मिळवून देण्यासाठी पोलिसांनी तात्काळ प्रयत्न करावेत. गुन्हेगारांवर कायद्याचा वचक बसेल अशा पद्धतीने तपास करून पीडित चिमुरडीला न्याय द्यावा, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले आहे.

# वाघोलीसह सात गावातील मुलभूत सुविधांसाठी केंद्राकडून ७१० कोटींचा निधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या वाघोली, मांजरी, हांडेवाडी औताडेवाडी, शेवाळवाडी, बावधन, वडाचीवाडी आणि होळकरवाडी या सात गावांमधील पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थेच्या प्रश्नांना मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्र सरकारच्या 'अर्बन चॅलेंज फंड' अंतर्गत पुणे महापालिकेला ७१० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, हा निधी येत्या काही दिवसांत उपलब्ध होणार आहे. या निधीमुळे संबंधित गावांतील नागरिकांच्या अनेक वर्षापासूनच्या समस्या सोडविण्यास मदत होणार असल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या सात गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) आणि पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे या भागांतील पिण्याच्या पाण्याचा आणि सांडपाणी व्यवस्थेचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे. याशिवाय अमृत योजनेअंतर्गत सुरू असलेली ३५० कोटींची विकासकामे सुरूच राहणार असून, महापालिकेला लवकरच आणखी निधी मिळण्याची शक्यता आहे. पुढील टप्प्यात या निधीतून रस्ते विकासाची कामेही हाती घेण्यात येणार आहेत.

# बेकायदेशीर लिंगनिदान व गर्भपात प्रकरणांवर कठोर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर |:** शहरासह जिल्ह्यात सुरू असलेल्या बेकायदेशीर लिंगनिदान व गर्भपात प्रकरणांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय लहुजी सेना यांच्या वतीने श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यास निवेदन देऊन करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, काही डॉक्टर, सोनोग्राफी सेंटर चालक व हॉस्पिटल चालक बेकायदेशीररीत्या सोनोग्राफी मशीनद्वारे गर्भातील लिंगनिदान करून त्यानंतर स्त्री भ्रूणहत्या व अवैध गर्भपात करत असल्याच्या घटना समोर येत आहेत. शासन व पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाई होत असतानाही काही ठिकाणी असे प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास येत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. गर्भातील लिंगनिदान करणे व त्यानंतर गर्भपात करणे हा कायद्याने गंभीर गुन्हा असून त्यामुळे समाजातील स्त्री-पुरुष प्रमाण बिघडत आहे. मुलींच्या जन्मदरावरही त्याचा गंभीर परिणाम होत असल्याची चिंता भारतीय लहुजी सेना यांनी व्यक्त केली आहे. संबंधित डॉक्टर, हॉस्पिटल चालक व दोषींवर भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित हॉस्पिटल व सोनोग्राफी सेंटरचे परवाने कायमस्वरूपी रद्द करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी भारतीय लहुजी सेना चे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल, राष्ट्रीय सचिव हनीफभाई पठाण, जिल्हाप्रमुख रज्जाक शेख, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख रईस शेख, रमजान शेख, विशाल मोजे, चेतन, रमिज पोपटिया, हर्षद प्रकुल्य, अक्षय वाघ, अभिजीत खैरे, लकी पांचाळ, युवराज पाटील, विशाल शेडगे, सचिन मंडलिक, गोपाल, अभिजीत पाटील, संदीप शिंदे, शुभम बागुल, सिकंदरभाई तांबोळी, यश पगारे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर निवेदन श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पीएसआय मगरे यांनी स्वीकारले.

# खरीप पीकस्पर्धा २०२५ चे राज्यस्तरीय निकाल जाहीर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील पीक उत्पादकता वाढीस चालना देण्यासाठी आणि प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या खरीप हंगाम सन २०२५ राज्यस्तरीय पीकस्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. राज्यस्तरीय पीक स्पर्धा निकाल समितीने कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच निकाल घोषित केले.

राज्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन घेण्यास प्रोत्साहन मिळावे, तसेच त्यांच्या यशस्वी शेती पद्धती इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात, या उद्देशाने राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येते. खरीप हंगाम २०२५ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या ११ पिकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

पीकस्पर्धेसाठी तालुका हा आधारभूत घटक मानण्यात येतो. शेतकऱ्यांच्या उत्पादकतेच्या आधारे राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर विजेत्यांची निवड केली जाते. ज्या शेतकऱ्यांची उत्पादकता संबंधित तालुक्यातील त्या पिकाच्या मागील पाच वर्षांच्या सरासरी उत्पादकतेच्या दीडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यांनाच पुरस्कारासाठी पात्र मानले जाते.राज्यस्तरीय निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे विजेते वगळून जिल्हास्तरीय पीक स्पर्धा निकाल समिती संबंधित जिल्ह्यातील स्पर्धकांमधून सर्वसाधारण आणि आदिवासी गटासाठी पीकनिहाय विजेत्यांची निवड करणार आहे. त्यानंतर तालुकास्तरावरही याच पद्धतीने प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक निश्चित करण्यात येणार आहेत.

कृषी विभागाकडून स्पर्धेत उच्चतम उत्पादकता मिळविणाऱ्या शेतकऱ्यांनी अवलंबिलेल्या शेती पद्धती, तांत्रिक उपाययोजना आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घडीपत्रिका तसेच विविध प्रचार माध्यमांतून इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. यामुळे राज्यातील एकूण कृषी उत्पादन वाढीस मदत होणार असल्याचा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

## निधन वार्ता

### अशोक उर्फ अंबादास लबडे



**श्रीरामपूर:** येथील लबडे वस्ती येथे राहणारे अशोक उर्फ अंबादास कारभारी लबडे (वय ५३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. निधनाच्या दिवशी त्यांचा वाढदिवसही होता. ते नगरसेवक मनोज लबडे यांचे चुलत बंधू होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात राहाता तालुका अव्वल

### सत्यमेव जयते फार्मर कप अंतर्गत सर्वाधिक ९६ शेतकरी गटांची बांधणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** कृषी क्षेत्रात सामूहिक प्रयत्नांमधून शाश्वत शेती, जलसंधारण आणि नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी कृषी विभाग, पाणी फाउंडेशन आणि उमेद विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेला राहता तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वाधिक ९६ शेतकरी गटांची बांधणी करून राहाता तालुक्याने जिल्ह्यात अग्रस्थान पटकावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे कृषी विभाग, शेतकरी आणि विविध संस्थांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उपविभागीय कृषी अधिकारी संगमनेर अक्षय गोसावी तसेच तालुका कृषी अधिकारी राहता आबासाहेब भोरे यांनी सातत्याने मार्गदर्शन करत शेतकरी गट उभारणी आणि स्पर्धेचे नियोजन प्रभावीपणे राबविले.



शेतकरी गटांच्या निर्मितीसाठी उमेद विभागाचे रवींद्र खलाटे, पवन पटारे, कृषी विभागाचे राजेश पऱ्हे, पाणी फाउंडेशनचे वैभव गारुडकर आणि रुपेश गायकवाड यांनी गावागावांत जाऊन जनजागृती, बैठका आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मोठे योगदान दिले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे तालुक्यात शेतकरी संघटनात्मक पातळीवर एकत्र येत असून सामूहिक शेती व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट होत आहे.

या उपक्रमांतर्गत पिंपरी निर्मळ येथे सरस्वती शेतकरी महिला गट यांच्या पुढाकारातून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात माती नमुना संकलन, दशपर्णी अर्क निर्मिती, तसेच विविध शेतीविषयक प्रात्यक्षिके घेण्यात आली. महिला आणि पुरुष शेतकरी सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामूहिक पद्धतीने माती नमुना घेण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष करून दाखवली. यासोबतच सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या दशपर्णी अर्क निर्मितीचे प्रात्यक्षिकही करण्यात आले.

कार्यक्रमावेळी मंडळ कृषी अधिकारी लोणी रमेश चोपडे यांनी शेतकरी गटांचे महत्त्व, सामूहिक शेती व्यवस्थापन, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी गटशेतीचे फायदे आणि शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सहाय्यक कृषी अधिकारी जया निमसे, आबा निर्मळ, वनिता निर्मळ, सुवर्णा निर्मळ, माया निर्मळ, सविता निर्मळ, कविता निर्मळ, सुरेखा निर्मळ, गणेश निर्मळ, मोहिनी निर्मळ, रवींद्र निर्मळ, स्वाती निर्मळ यांच्यासह महिला आणि शेतकरी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहता तालुक्यात उभारण्यात आलेले हे शेतकरी गट केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न राहता सामूहिक शेती, नैसर्गिक शेती, मृदा आरोग्य संवर्धन, जलव्यवस्थापन आणि शाश्वत कृषी विकासासाठी प्रभावी माध्यम ठरत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. जिल्ह्यात सर्वाधिक गट बांधणीची नोंद करून राहता तालुक्याने कृषी क्षेत्रातील सामूहिक उपक्रमांसाठी आदर्श निर्माण केला आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि .१८ मे २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १५६ २४६ ६६० | २-९ | १२६ ४८९ ९०० | जोड २५-७९-४८ ३०-९६ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-६ | १२३ १५० १२४ | जोड ५१-२६-७८-९३-६४ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२५ ४६८ ८०० | ८-१ | १२८ १४६ १०० | जोड ८०-३१-२५-६७-१९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

द • ख • ल

## वेदांत वैभव राहिंज राज्यात द्वितीय : इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड

**अहिल्यानगर :** वेदांत राहिंज राज्यात द्वितीय क्रमांक तर संस्कृती वायकर हिने जिल्ह्यात तिसरा क्रमांक प्राप्त करत लक्ष्मीबाई भाऊराव



पाटील शाळेचा झेंडा फडकावला NEP २०२० नुसार जीवनभिमुख शिक्षण देणारे पहिले पाऊल..!! हे ब्रीद घेऊन एज्यूमिट अकॅडमी, महाराष्ट्र राज्य आयोजित भारत टॅलेंट सर्च (BTS) राज्यस्तरीय परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे .राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील इयत्ता चौथीचा विद्यार्थी वेदांत वैभव राहिंज याने १५० पैकी तब्बल १४६ गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक तर संस्कृती रविंद्र वायकर हिने इयत्ता पहिलीत जिल्ह्यातून तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे. राज्यभरातून परीक्षेला बसलेल्या हजारो विद्यार्थ्यांमधून हे यश मिळवत त्याने शाळेचे, पालकांचे तसेच परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. मार्च २०२६ मध्ये पार पडलेल्या या राज्यस्तरीय परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत वेदांतने राज्यस्तरीय इस्त्रो शैक्षणिक सहलीच्या बक्षिसाचा मान पटकावला आहे. भारत टॅलेंट सर्च (BTS) परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा, तार्किक विचारशक्तीचा व शैक्षणिक प्रगतीचा शोध घेणारी राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा मानली जाते.

## हरदिन मॉर्निंग ग्रुपला रक्तदान शिबिर संयोजक गौरव पुरस्कार



**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असलेल्या हरदिन मॉर्निंग ग्रुपला जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने रक्तदान शिबिर संयोजक गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत शिबिर राबविल्याबद्दल ग्रुपच्या कार्याची दखल घेण्यात आली. खा. निलेश लंके यांच्या हस्ते ग्रुपच्या सदस्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यास मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, उपाध्यक्ष संतोष डुंगरवाल, कार्यवाह सतीश इंदानी, सहकार्यवाह आदित्य चांदेकर, कोषाध्यक्ष अनिल धोकरीया, डॉ. विलास मढीकर, डॉ. दिलीप धनेश्वर, रूपेश भंडारी, सागर उंडे, किशोर यादव, सोनाली खांडरे आणि नीता बडवे यांच्यासह रक्तपेढीचे संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्यासह रमेश वराडे, सचिन पेंढुरकर, अविनाश पोतदार, सुभाष पेंढुरकर, शेषराव पालवे, सर्वेश सपकाळ, अभिजीत सपकाळ, सुनीताताई वराडे, प्रांजली सपकाळ यांनी पुरस्कार स्वीकारला.

## चिखली ग्रामपंचायतीतील सार्वजनिक वाचनालय प्रकरण तापले

**अहिल्यानगर :** मौजे चिखली ता. श्रीगोंदा येथील खासदार निधीतून उभारण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाची इमारत कोणतीही शासकीय निर्लेखन मंजुरी न घेता पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणी सरपंच, ग्रामसेवक व संबंधित दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. माजी सैनिक महेश भिवसेन झेंडे यांनी आपले सरकार पोर्टलवर याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या स्तरावर त्रिस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या चौकशीत सार्वजनिक वाचनालयाची इमारत निर्लेखन प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वीच पाडण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती समोर आली आहे. सदर वाचनालयाची इमारत खासदार फौझिया तहसीन खान यांच्या खासदार निधीतून सन २०१०-२०११ मध्ये बांधण्यात आली होती. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, ९ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री जेसीबीच्या सहाय्याने चांगल्या स्थितीतील वाचनालय पाडण्यात आले. विशेष म्हणजे, त्यावेळी कोणतीही अधिकृत निर्लेखन मंजुरी घेतलेली नव्हती. त्यानंतर १७ मार्च २०२५ रोजी तक्रार दाखल झाल्यावर संबंधितांनी पाठपुरावा करून १९ मार्च २०२५ रोजी निर्लेखन आदेश मंजूर करून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच निर्लेखन प्रस्तावात चुकीची माहिती देण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. तक्रार अर्जानुसार, प्रस्तावात वाचनालयाच्या शेजारी शाळा असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात त्या परिसरात शाळा नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच वाचनालय इमारतीचे वय ३० वर्षे दाखविण्यात आले असले तरी संबंधित इमारत २०१०-२०११ मध्ये उभारण्यात आली असल्याने हा दावा खोटा असल्याचे सांगण्यात आले आहे.

## ऑन लाईन मेडिसीनचे दुष्परिणाम तात्काळ बंद करण्याची मागणी

**एरंडगाव :** ऑन लाईन मेडिसीन मागविण्याचे दुष्परिणाम लक्षात घेऊन ही पध्दत तात्काळ बंद करण्यात यावी या अत्यंत गंभीर व महत्वाच्या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट ॲड ड्रगीस्ट असोसिएशनच्या वतीने येत्या बुधवारी (दि २० ) संपूर्ण देशातील औषध विक्रेते एक दिवसीय बंद पाळणार असून त्यानंतर शासनाच्या प्रतिसादानुसार आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे. यासंदर्भात शनिवारी दिनांक १५ ला येथील महात्मा सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात शेवगाव केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करून संघटनेचे सर्व पदाधिकारी व तालुक्यातील केमिस्ट बांधवांच्या उपस्थितीत या मागणीवर चर्चा होऊन हा ठराव एकमताने पारित करण्यात आला. तसेच मागणीचे सविस्तर निवेदन यावेळी तहसीलदार, पोलिस निरीक्षिक यांना देऊन त्याच्या प्रति राज्य व केंद्र शासनाला मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत. यावेळी तालुका केमिस्ट अँड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सुरज पाटील लांडे ,बाळासाहेब देशपांडे, गहिनीनाथ बडे यांनी निवेदन दिल्या नंतर या मागणीचे महत्व थोडक्यात विषद केले. कोविड काळात लोक घराबाहेर पडणे योग्य नव्हते म्हणून ऑनलाईन औषध मागणीच्या प्रकाराला असलेली कोर्टाची बंदी उठविली .मात्र कोविड संपल्यानंतर ती बंदी तातडीने पुनश्च लागू करणे आवश्यक होते. ते न झाल्याने देशभरातील सुमारे १३ लाख केमिस्ट व त्यावर अवलंबून असणारे असंख्य कुटुंब अडचणीत आले. त्यांच्या ऐवजी ऑनलाइन व्यवसायातील काही कार्पोरेट कंपन्याच तेजित आल्या. त्यांतून अवैध प्रकार सुरू झाले. या ऑनलाइन पद्धतीतून नार्कोटिक - नशेची,तसेच गर्भपातकरण्याचे औषध सहज उपलब्ध होऊ लागली. शिवाय अर्धवट माहितीद्वारे घेतलेल्या औषधाचे दुष्परिणाम होऊ लागले. बनावट औषधाचाही सुळसुळाट होऊन रुणांचे हाल होऊ लागले.

# डीजे संस्कृतीवर न्यायालयाचे ताशेरे

### शहरात ज्ञानगुढीतून वैचारिक क्रांतीचा उद्घोष



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जयंती-उत्सवाच्या नावाखाली वाढत चाललेल्या कर्णकर्कश डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण आणि दिखाऊ शक्तिप्रदर्शनावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कठोर निरीक्षण नोंदवत समाजासमोर महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केला आहे. न्यायालयाच्या या निरीक्षणाचे पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. त्याला राष्ट्रीय सलामी देण्यात आली आहे.

याच पार्श्वभूमीवर दिल्लीगेट वेस येथे रविवारी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित ज्ञानगुढी उभारून वैचारिक, बौद्धिक आणि संविधानिक चळवळीचा प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमाद्वारे डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण, अंधानुकरण, मानसिक गुलामगिरी आणि दिखाऊ राजकारणाला विरोध नोंदवण्यात आला. आज अनेक ठिकाणी जयंती उत्सव हा डीजे, फटाके, वाहतूक कोंडी, रस्ते बंद आणि सोशल मीडिया प्रसिद्धीपुरता मर्यादित होत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. समाजाला दिशा देणारे विचार मागे पडत आहेत आणि दिखाऊपणाला अधिक महत्त्व दिले जात आहे. यावेळी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, बाळासाहेब पालवे, प्रकाश थोरात, वीरबहादुर प्रजापती, ॲड. अमित थोरात, अशोक भोसले, पोपट भोसले, शिवाजी बलोटे, विजय शिरसाठ, राम धोत्रे, प्रकाश गोसावी, शाहीर कान्हू सुंबे, प्रतीक म्हस्के यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील मा. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फलके आणि मा. न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहेता यांनी आपल्या निरीक्षणात स्पष्टपणे नमूद केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौद्धिक विकास आणि वंचितांचे उत्थान अधिक प्रिय असते. न्यायालयाचे हे निरीक्षण केवळ कायदेशीर टिप्पणी नसून आधुनिक भारतीय समाजाला अंतर्मुख करणारा संदेश असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

यावेळी बोलताना ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, देश स्वतंत्र झाला असला तरी अनेकांच्या मनामध्ये अजूनही मानसिक गुलामगिरीची साखळी कायम आहे. सामाजिक परिवर्तनासाठी केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरेसे नसून वैचारिक आणि मानसिक स्वातंत्र्य आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उभारण्यात आलेली ज्ञानगुढी ही डीजे संस्कृती, ध्वनीप्रदूषण आणि दिखाऊ शक्तिप्रदर्शनाविरोधातील वैचारिक प्रतीक आहे. अशोक सब्बन, प्रकाश थोरात यांची यावेळी भाषणे झाली. ज्ञानगुढी ही वाचनालये, अभ्यासिका, संविधान वाचन, विज्ञाननिष्ठ चर्चा, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत आणि जातीय मानसिकतेविरुद्ध वैचारिक लढा यासाठी प्रेरणा देणारी चळवळ ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपस्थित कार्यकर्त्यांनी भविष्यात जिल्हाभर ज्ञानगुढी अभियान राबवून युवकांमध्ये संविधानिक जागर, बौद्धिक चर्चा, अभ्यासिका निर्मिती, सामाजिक जबाबदारी आणि विवेकवादी विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर

### युवकांनी सामाजिक कामाच्या माध्यमातून नावलौकिक वाढवावा : आ. जगताप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते. आपण ज्या भागात राहतो त्या भागातील नागरिकांचे छोटे-मोठे प्रश्न हाती घेऊन ते सोडविण्यासाठी काम केले पाहिजे. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांचा विश्वास संपादन करणे हेच खरे कार्यकर्त्याचे वैशिष्ट्य असते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांची निवड झाली असून त्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून पदाचा नावलौकिक वाढवावा, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक कार्याध्यक्षपदी ऋषिकेश रासकर यांना निवडीचे पत्र प्रदान करताना आ. संग्राम जगताप, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, युवक शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, वैभव ढाकणे, नितीन घोडके, दीपक खेडकर, मयूर बलदोटा, जगु शिंदे, रोहन रासकर, बाबासाहेब हराळ व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संपत बारस्कर म्हणाले की, युवकांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जोपासत समाजहिताचे काम करणे गरजेचे आहे. आजचा युवक मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनतेकडे आकर्षित होत असून त्यांना या प्रवृत्तींपासून दूर ठेवण्यासाठी समाजप्रबोधनाची आवश्यकता आहे. युवकांनी पुढाकार घेत चांगली पिढी घडविण्यासाठी काम करावे. ऋषिकेश रासकर यांनी युवकांचे प्रश्न सोडविण्याबरोबरच पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवावेत. तसेच आ. संग्राम जगताप यांनी हाती घेतलेल्या हिंदू रक्षणाच्या कामामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे ते म्हणाले.

युवक शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर म्हणाले की, ऋषिकेश रासकर युवकांमध्ये संघटन वाढवून पक्ष बळकट करण्यासाठी ते निश्चितच चांगले काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवनियुक्त युवक कार्याध्यक्ष ऋषिकेश रासकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून युवक कार्याध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे. त्या विश्वासाला पात्र राहून समाजकार्य करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील. आ. संग्राम जगताप यांचे हिंदुत्ववादी विचार युवकांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करणार असून केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना युवकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. युवकांचे प्रश्न सोडवून संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## वाळुंबा नदीवरील पूल आणि लेंडी पूल बनले धोकादायक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील वाळकी गावाजवळील वाळुंबा नदीवरील मुख्य पूल आणि लेंडी पूल यांची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून, मागील वर्षीच्या पुरामुळे झालेल्या नुकसानीनंतरही अद्याप कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आलेली नाही. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या पुलांची तातडीने दुरुस्ती करून नवीन, मजबूत आणि उंच पूल उभारावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांनी केली आहे.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे वाळकी गावाला मोठ्या पुराचा फटका बसला होता. संपूर्ण गावाला पाण्याने वेढा घातला होता. या पुरामध्ये अनेक जनावरे वाहून गेली होती. गाय, म्हैस आणि शेळ्यांचे मोठे नुकसान झाले होते. काही ठिकाणी जीवितहानी झाल्याच्याही घटना घडल्या होत्या. या नैसर्गिक आपत्तीनंतरही पुलांच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वाळुंबा नदीवरील मुख्य पूल आणि लेंडी पूल हे गावासाठी अत्यंत महत्त्वाचे दळणवळणाचे मार्ग आहेत. मात्र सध्या दोन्ही पुलांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. पुलाच्या अनेक भागांमध्ये मोठमोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी संरचना खचल्याचे चित्र दिसत आहे. प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात मुरूम आणि डबर टाकून खड्डे बुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला असला, तरी मुसळधार पाऊस झाल्यानंतर ही मलमपट्टी पुन्हा वाहून जाण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## जनगणना एकजुटीसाठी मातंग समाज सज्ज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान यांच्या वतीने अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहात सकल मातंग समाजाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या अ.ब.क.ड. उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर मातंग समाजाच्या विविध प्रश्नांवर या बैठकीत सखोल चर्चा झाली. तसेच समाजाच्या मागण्यांसंदर्भात राज्य सरकार व मुख्यमंत्री कार्यालयातील सचिव राजेश अग्रवाल यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती दिली.

बैठकीचे आयोजन सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नामदेवराव चांदणे यांनी केले होते, तर अध्यक्षस्थानी भालेराव सर होते.

यावेळी नामदेवराव चांदणे म्हणाले की, मातंग समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी समाज एकत्र येणे काळाची गरज आहे. शासनाने उपवर्गीकरणाचा प्रश्न तातडीने निकाली काढावा, यासाठी समाजाने संघटितपणे आवाज उठविणे आवश्यक आहे. अहिल्यानगर शहरात लवकरच भव्य मातंग समाज मेळावा आयोजित करण्यात येणार असून या मेळाव्यास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. या मेळाव्यात 'जीवन प्रवास' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भालेराव सर म्हणाले की, १५ मे पासून जनगणना सुरू झाली असून समाजातील प्रत्येक व्यक्तीने माहिती देताना 'हिंदू-मांग (मातंग)' असा स्पष्ट उल्लेख करावा. समाजाच्या अस्तित्वासाठी व हक्कांसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. आगामी मेळावा समाजाच्या एकजुटीचा नवा अध्याय ठरेल.

बैठकीस काशिनाथ सुलाखे पाटील, लक्ष्मण साबळे, शरद मोहिते, दत्तात्रय तुजारे, विष्णू मोहिते, प्रकाश पुजारे, लक्ष्मीकांत भालेराव, बाबासाहेब शिंदे, अशोक भोसले, पी. बी. पाथरे, दिवसेन घोरपडे, रंजीत वैरागर, अरुण ताकवाले, आकाश जगधने, प्रवीण अवचिते, बीडी शेलार, वसंतराव सकट, हिराबाई गोरखे, दत्तू गोरखे, किरण आढागळे, संजय वैरागर, ज्ञानेश्वर साठे, निलेश सरोदे, अभिजीत पवार, धीरज पवार, निलेश पवार आदींसह समाजबांधव व प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शांतीनगरच्या कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** प्रभाग क्रमांक १३ मधील सारसनगर-शांतीनगर परिसरातील रस्त्याच्या कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर मार्ग मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी नगरसेवक सुरेश बनसोडे, अविनाश घुले, विपुल शेट्टीया, राजेंद्र पडोळे, संतोष सूर्यवंशी, शिरील जाधव, विक्टर पवार, जेकब जाधव, सुरेश आरोळे, दीपक साळवे, मनोज साळवे, अंकुश मोहिते, जी. एम. जेम्स, जॉन राजू अगस्ती, नंदकुमार परदेशी, ठाकूर दास परदेशी, फ्रांकलीन कुटिनो, सुषमा प्रभाकर, बार्नबस अगस्ती, नित्यांनंद कांबळे नीरज मकासरे, चंद्रकांत देठे, योगेश शेळके, अमित कनोजिया, प्रशांत पवार, रवी थोरवे, गिरीश परदेशी, अशोक सोनवणे, प्रीतम गायकवाड, किरण आल्हाट, किशोर शिंदे, अविनाश चौधरी, गणेश साबळे, भूषण तांबे, नितीन साबळे, मनीष कनोजिया, ओम तांबे, गणेश कोल्हे आकाश शिंदे, प्रकाश भिंगारदिवे आदींसह नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले की, शहरातील प्रत्येक प्रभागात दर्जेदार विकासकामे पोहोचवण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. नागरिकांना चांगले रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व प्रशासनाच्या माध्यमातून नियोजनबद्ध कामे केली जात आहेत. शांतीनगर परिसरातील नागरिकांनी अनेक वर्षांपासून रस्त्याच्या समस्येबाबत मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत चारही नगरसेवकांच्या माध्यमातून या कॉँक्रिटीकरण कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, भविष्यातही परिसराच्या विकासासाठी कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

केवळ भूमिपूजन करून थांबणे हा आमचा हेतू नसून कामाची गुणवत्ता आणि नागरिकांचे समाधान यालाच आम्ही प्राधान्य देत आहोत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक अविनाश घुले यांनी तर आभार प्रदर्शन विपुल शेट्टी यांनी मानले.

# मोबाईलवर फिरणाऱ्या अंगठ्यात आलेला मेंदू

### वाचनातून डोक्यात ठेवा : तांदळे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मानवी संवेदना कुंठीत होत असताना मोबाईलवर दीड मिनिटाच्या रिल फिरणाऱ्या अंगठ्यात मेंदू आला आहे. वाचन, संवाद ,पुस्तके यांच्या माध्यमातून मेंदूला पुन्हा डोक्यात नेऊन ठेवण्याचे आव्हान आज समोर ठाकले असून त्यासाठी प्रत्येकाने डेली रीडर बना असे कळकळीचे आवाहन जागतिक कीर्तीचे लेखक, वक्ते शरद तांदळे यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेत व्यक्तिमत्त्वाची जडणघडण या विषयावर ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, डॉ.राजा ठाकूर, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, राहुल तांबोळी, किरण आग्रवाल, अमोल इथापे, नितीन भारताल,पल्लवी कुकडवाल उपस्थित होते.

लेखक शरद तांदळे यांनी जीवनातल्या वेगवेगळ्या टप्प्याचा वाचन प्रवास त्यातील प्रेरणादायी पद्धतीने सांगताना उपस्थितांना आत्मपरीक्षण करावयास भाग पाडले. आपण आपल्या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळे साहित्य वाचन करतो परंतु ते अत्यंत सुमार तर कधी केवळ दाखविण्यासाठी असते. अशातून अनेकजण नको त्या वयात बोलायला लागतात. त्यामध्ये सोशल मीडियावर फिरणारी खोटे मेसेज यातून होणारे मनभेद घातक आहेत. दूषित वातावरणात दुर्दैवाने महापुरुषांचे साहित्यही आता जाती जातीत वाटले जाऊ लागले आहे. यातून मेंदू खराब होण्यास सुरुवात झाली आहे. यामधून मुलांनी नेमके काय वाचायचे? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

सोशल मीडियामुळे अनेक गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. अगदी बालवयातील मुले चंपक न वाचता हॅरीपॉटरची मागणी जेव्हा करतात तेव्हा बालसाहित्यिकांसमोर नव्या पिढीला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या साहित्याची निर्मिती करणे हे मोठे आव्हान असल्याचे तांदळे म्हणाले.

व्यक्तिमत्व विकासामध्ये वाचन हा 'छंद' नव्हे तर ती 'गरज 'आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आम्ही काय वाचावे ?असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा ज्याचे कार्य आहे त्याचे साहित्य आपण वाचले पाहिजे. कारण पुस्तके ही बाय प्रॉडक्ट आहे. मोटिवेशन पुस्तकांच्या भ्रामक जगात भारतीय संस्कृतीत पैसे कमवण्याबरोबर ते दाखवायचे कुणाला हा प्रश्न पडत नाही कारण आम्ही सर्वांना बरोबर घेऊन चालतो. मोटिवेशनल बरोबर ॲक्शन आणि एक्सेप्टन्स या दोन गोष्टी व्यक्तिमत्व विकासात महत्त्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. रावण पुस्तकाच्या माध्यमातून मानवी सत्य अभ्यासपूर्णपने मांडल्यामुळे लोकांना आपलेसे वाटले.आपले समर्पण असेल तर आपली कोणतीही पार्श्वभूमी, परिस्थिती यशाला अडसर ठरत नाही. जगातल्या सगळ्या क्रांत्या पुस्तकांच्या विचारातून झाल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचे आव्हान होते तर आता पाश्चात मेंटली गुलाम करणाऱ्या कंपन्यांचे आव्हान आमच्यासमोर आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत असंख्य समस्या झेलण्याची परंपरा असलेल्या या देशात युवा पिढी मात्र नैराश्याच्या गर्दीत सापडली आहे. अशा परिस्थितीत घरातील आजी आजोबांनी उगवत्या बाल पिढीच्या हाती पुस्तके देऊन त्यांना टेक्नॉलॉजीच्या गुलामगिरीतून बाहेर पाडण्याचे काम ते करू शकतात. जगातील महान लेखक, व्यावसायिक खेळाडू, अभिनेते, आर्टिस्ट हे रोजच्या पुस्तक वाचनातून घडले आहेत. आपली स्वप्न कोणत्याही परिस्थितीत मरू द्यायचे नसेल कोणत्याही परिस्थितीत आम्हाला संघर्ष करावा करायचा असेल तर डेली रीडर व्हा त्याला कृतीची जोड द्या असे कळकळीचे आव्हान त्यांनी केले.

उपस्थित तरुणाई आणि सजग वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखक तांदळे यांनी उत्तरे देऊन सुसंवाद साधला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ज्योती कुलकर्णी परिचय शिल्पा रसाळ सत्कार डॉक्टर राजा ठाकूर तर आभार राहुल तांबोळी यांनी मांडले.

द•ख•ल

## जयाद्री शक्तिपीठ जानाईदेवीला चंदन उटी, मोगरा फुलांची साज सजावट



**जेजुरी** : दिनांक १७ महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता जयाद्री शक्तिपीठ जानाईदेवीला चंदन उटीचां साज करण्यात आला , तसेच जानाई देवी मंदिरात मोगराफुलांची साज सजावट करत मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. जेजुरी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी जयाद्री शक्तिपीठ जानाई वसुंधरा देवीच्या पौराणिक मंदिरात येथील मानकरी ग्रामस्थ गुरव यांनी धार्मिक विधिवत पूजाअर्चा करीत थंड आशा चंदन उटीने मूर्तीला थंडवा मिळावा म्हणून मूर्तीला लेप दिला.पुण्यदायी पापनाशक आशा अधिकमासा चे आगमन आणि वैशाखी समाप्ती असा योग साधून देवीला महास्नान घालण्यात आले , त्यानंतर चंदन उटी चां साज करून मग मोगऱ्याच्या फुलांची सजावट करण्यात आली. यानिमित्त भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. नित्य सेवेकरी, व जानाई भक्तांच्या वतीने हा मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला.

## आठ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार; नातेवाईक आरोपी अटकेत

**कोंढवा** : येवलेवाडी परिसरात आठ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून पोलिसांनी आरोपीला तत्काळ अटक केली आहे. या प्रकरणी कोंढवा पोलिस ठाण्यात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीचे वय आठ वर्षे सहा महिने नऊ दिवस असून घटना १४ मे रोजी घडली. मुलीच्या आईने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी धनराज बालाटी याला अटक केली. आरोपी हा पीडित मुलीच्या आईचा चुलता असल्याची माहिती समोर आली आहे. आरोपी आणि फिर्यादी हे दोघेही मूळचे नेपाळचे रहिवासी असून उदरनिर्वाहासाठी येवलेवाडी परिसरात वास्तव्यास आहेत. दोन्ही कुटुंबे शेजारी शेजारी राहत होती. आरोपी किरकोळ काम करून उदरनिर्वाह करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनेनंतर पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. आरोपीला न्यायालयाने उद्यापर्यंत पोलिस कोठडी सुनावली असून त्याला उद्या पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पुढील तपास कोंढवा पोलिस करत आहेत.

## काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांची घणाघाती टीका

**पुणे** : देशाचे 'सतत बदलते व अस्थिर परराष्ट्र धोरण', देशात पसरत चाललेली अशांतता व बिघडत चाललेला सामाजिक सलोखा, वाढता कट्टरतावाद व अमेरीकेच्या दबावाखाली भारत स्वीकारत असलेल्या सततच्या समझोत्याच्या भुमिके'मुळे देशास आयात - निर्यातीसाठी अमेरिकेचे अन्यायकारक ट्रेड डील व वाढते टॅरीफ'दर स्वीकारावे लागत असून, या सर्व हालाखीच्या स्थितीत कंटाळून देशातील परकीय गुंतवणूकदार हे गेल्या काही महिन्यांपासून (२०२६ मध्ये) भारतातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर काढून घेत असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस'चे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केला. भारतातील परकीय गुंतवणूकदारांनी सुमारे १ कोटी ८० लाख परकीय गुंतवणूक देशाबाहेर नेल्याचा अहवाल 'फायनाशियल टाईम्स' ने नुकताच जारी केल्याचा संदर्भ देत काँग्रेस ने देश हिताच्या, लोकशाही वादी 'सत्यशोधक, वास्तववादी व निर्भिड पत्रकारीतेचे' अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले की 'परकीय गुंतवणूक दारांचे व्यतिरिक्त' ही गेल्या २-३ वर्षांत भारतीय गुंतवणूकदार व भांडवलदार देखील देश सोडून विदेशात जाऊन आपले नागरिकत्व स्थापित करत आहेत व त्यांचा ही मोठा फटका देशाच्या अर्थव्यवस्थेला बसत आहे ही गेल्या ७५ वर्षातील देशासाठी सर्वाधिक नामुष्कीची व शरमेची बाब आहे. या सर्वांचाच अनिष्ट परीणाम भारताच्या परकीय गंगाजळी'वर होत असून, देशाचा विकास दर कमी होण्यात, महागाई व बेरोजगारी वाढण्यात याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे मात्र भाषण जीवी मोदी सरकार वास्तवतेकडे अक्षम्य डोळेझाक करत असून, बेफिकीर पंतप्रधान मोदी विदेशात 'स्वागत सत्कार' स्वीकारत असल्याची टिका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस'चे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली.

## नीट पेपरफुटीप्रकरणी पुण्यात संताप; १९ मे रोजी आत्मदहन आंदोलनाचा इशारा

**पुणे** : देशभर गाजत असलेल्या नीट २०२६ परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून पुण्यातही संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित शिक्षण माफिया, एजंट आणि कोचिंग क्लासेसवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय छात्र संघटना आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पुणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, अखिल भारतीय छात्र संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्री. मच्छिंद्र चिंचोळे यांनी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, देशभरात सातत्याने होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे मानसिक, शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान होत आहे. लाखो विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत घेऊन परीक्षा देतात; मात्र काही शिक्षण माफिया आणि भ्रष्ट प्रवृत्तीमुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जात आहे. लातूर येथे या प्रकरणात काही आरोपींना अटक करण्यात आली असली तरी, या रॅकेटमागील सर्व संबंधितांची चौकशी होणे गरजेचे असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. पुण्यातही अनेक कोचिंग क्लासेस नियमबाह्य प्रवेश प्रक्रिया राबवत असून, मोठमोठ्या जाहिराती आणि खोट्या यशकथा दाखवून विद्यार्थ्यांची दिशाभूल करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही क्लासेस विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये शुल्क घेत असून, गुणवत्तेपेक्षा केवळ व्यावसायिक फायद्यासाठी शिक्षण व्यवस्था चालवली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अशा संस्थांची आर्थिक चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, पेपरफुटीच्या तणावातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची मदत द्यावी आणि परीक्षा दिलेल्या सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, येत्या १९ मे २०२६ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आत्मदहन आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अखिल भारतीय छात्र संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनात पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्री. मच्छिंद्र चिंचोळे, पुणे जिल्हाध्यक्ष अक्षय बोडके, पुणे जिल्हा अल्पसंख्याक उपाध्यक्ष सय्यद समीर टीपु यांच्यासह विविध सामाजिक आणि शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

# पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी

### प्रथम पुरस्कार दिवंगत अजित पवार यांच्या नावाने देणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धेच्या विजेत्यांचा गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.




कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा-२०२६'च्या समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर , हेमंत रासने,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाचा कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने समयुक्तपणे राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यामागे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष योगदान आहे. यंदाच्या स्पर्धे साठी तब्बल १ हजार २९० अर्ज प्राप्त झाले असून विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या वर्षीच्या स्पर्धेतील चार संशोधन प्रकल्पांचे उत्पादन प्रत्यक्षात सुरू झाले असून आणखी १२ उत्पादने लवकरच बाजारात येणार आहेत.

या स्पर्धेतून केवळ कल्पना मांडल्या जात नाहीत, तर त्या प्रत्यक्ष उत्पादनात उतरून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची क्षमता ठेवतात. यंदाच्या स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही श्री. फडणवीस यांनी दिली.

प्रदर्शनात शेतीतील तंत्रज्ञानाचा प्रभावी वापराबाबत उपयुक्त नवकल्पना आहेत. उपग्रह नकाशांकन आणि मृदा परीक्षणाच्या आधारे जमिनीचे अचूक विश्लेषण करणारे नमुने, शेताच्या रचनेनुसार ओलावा व्यवस्थापन करून आवश्यक तेवढाच पाणीपुरवठा करणारी यंत्रणा, तसेच तण आणि पीक ओळखून स्वतंत्र फवारणी करणारे तंत्रज्ञान अशा विविध संकल्पनांचे मुख्यमंत्री यांनी विशेष कौतुक केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असून भविष्यात त्याची अचूकता आणखी वाढेल. पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी मानवरहित यंत्रे आणि उपग्रह नकाशांकनाच्या माध्यमातून अचूक अहवाल तयार करणारे तंत्रही उपयुक्त ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धे चे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कृषी आयुक्त सूरज मांढरे म्हणाले, बदलते हवामान, पाण्याची कमतरता, खतांची टंचाई, मजुरांची कमतरता आणि बाजारभावातील चढ-उतार या विविध आव्हानांना सामोरे जाताना कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. नवोपक्रमांना चालना देण्यासाठी आणि जागतिक पातळीवरील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रदर्शनाची पाहणी;नवकल्पनांचे कौतुक :**
पुणे ॲग्री हॅकॅथॉन-२०२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. प्रत्येक स्टॉलवर थांबून त्यांनी संशोधकांशी आणि युवा उद्योजकांशी थेट संवाद साधत त्यांच्या संकल्पना समजून घेतल्या आणि त्यांच्या संशोधनाचे कौतुक करीत प्रोत्साहनही दिले. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाययोजना, स्मार्ट सिंचन प्रणाली, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा परीक्षण, स्वयंचलित उपकरणे तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध संशोधनात्मक प्रकल्पांविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्सुकतेने माहिती घेतली. प्रकल्प सादर करणाऱ्या तरुणांच्या कल्पकतेचे त्यांनी कौतुक करत कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोठे परिवर्तन घडवून आणण्याची गरज अधोरेखित केली.

यावेळी त्यांनी विविध उपकरणांची कार्यपद्धती समजून घेत संशोधकांना प्रोत्साहनपर प्रश्न विचारले. अनेक स्टॉलवरील संशोधन प्रत्यक्ष पाहून त्यांनी अशा उपक्रमांमधून राज्यातील युवकांना नवसंशोधनासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे अधोरेखित केले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आलेले नऊ विभागांतील विजेते आणि उपविजेते :**

'' मृदा आरोग्य व व्यवस्थापनविजेता : किसान साथी उपविजेता : नॅनो वीटा '' स्मार्ट जल व्यवस्थापन व स्वयंचलनविजेता : आयओएच अभियंता समूह उपविजेता : फार मोअर

'' कृषी यांत्रिकीकरण (कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्रमानव तंत्रज्ञान) विजेता : एग्रीटेक नेक्सस पविजेता : टीम व्हीएनएमकेव्ही '' कृषी प्रक्रिया व मूल्य साखळी विजेता : विन विन बाईट्सउपविजेता : सिल्कस्कॅन इनोव्हेटर्स '' अक्षय ऊर्जा व कृषी कचरा व्यवस्थापन विजेता : प्रोटो फीड्स उपविजेता : इको एक्सट्रॅक्ट '' पीक संरक्षण व कीड व्यवस्थापन

विजेता : स्मार्ट बायो डिलिव्हरीउपविजेता : कृषी नेत्र '' हवामान अनुकूल व डिजिटल शेती विजेता : डीप अँग बॉटउपविजेता : मॉडर्न व्हिलेज फ्यूचर इनोव्हेशन्स '' भूस्थानिक व भौगोलिक माहिती प्रणाली आधारित पीक सर्वेक्षण व्यवस्था विजेता : क्रॉप जेन एआय उपविजेता : ग्रीन माइंड्स '' स्मार्ट कृषी प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता विजेता : ई-पिक ऑडिट एआय उपविजेता : कृषी प्रबंध

## पेसा मोबिलायझर्सची पदे रद्द करू नका; केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम १९९६ अर्थात पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यरत असलेल्या पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सची पदे कमी करण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच आणि पेसा मोबिलायझर संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांच्याकडे करण्यात आली. पेसा कायदा २४ डिसेंबर १९९६ रोजी देशभर लागू करण्यात आला असून, आदिवासी समुदायांना स्वशासनाचे अधिकार देणारा हा ऐतिहासिक कायदा मानला जातो. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनाने प्रत्येक पेसा ग्रामपंचायतीत ग्रामसभा मोबिलायझर्सची नियुक्ती केली होती. गेल्या आठ ते दहा वर्षांपासून हे मोबिलायझर्स आदिवासी गावांच्या पातळीवर पेसा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यरत आहेत. मात्र, केंद्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार यापुढे तीन ग्रामपंचायतींसाठी एकच पेसा ग्रामसभा मोबिलायझर नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सुमारे ३००० पेसा मोबिलायझर्सपैकी जवळपास २००० जणांना कामावरून कमी करण्याची वेळ येणार असल्याने हा निर्णय अन्यायकारक असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर १६ मे २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांची भेट घेतली. यावेळी माजी खासदार वृंदा करात, त्रिपुरा विधानसभेचे विरोधी पक्षनेते जितेंद्र चौधरी, आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचच्या राष्ट्रीय नेत्या मरियम ढवळे यांच्यासह मंचाचे पदाधिकारी उपस्थित होते. आदिवासी भागांची भौगोलिक रचना आणि स्थानिक गरजा लक्षात घेता पेसा ग्रामसभा मोबिलायझर्सची संख्या कमी करण्याऐवजी वाढविण्याची आवश्यकता असल्याचे शिष्टमंडळाने नमूद केले. तसेच आदिवासी विकासासाठी हे पद महत्त्वाचे असल्याने केंद्र सरकारने घेतलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम यांनी या विषयाची सविस्तर माहिती शिष्टमंडळाकडून घेतली. पेसा मोबिलायझर्सची पदे कमी करणे योग्य ठरणार नसल्याचे मत व्यक्त करत केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांशी समन्वय साधून हा निर्णय मागे घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. या शिष्टमंडळात आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचच्या मरियम ढवळे, अजित अभ्यंकर, डॉ. अजित नवले, किरण गहला, विजय गाभणे, अमोल मारकवार, शंकर सिडाम, कुमार मोहमपुरी, डॉ. अमोल वाघमारे आणि संगीता साळवे यांचा समावेश होता.



## पुण्यात २२ ते २४ मे दरम्यान सहावा मराठी फिल्म फेस्टिव्हल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : मराठी चित्रपटसृष्टीतील वैविध्यपूर्ण कथा, नव्या विचारांची मांडणी आणि सर्जनशीलतेचा उत्सव साजरा करणारा सहावा 'मराठी फिल्म फेस्टिव्हल' २२ ते २४ मे २०२६ दरम्यान पुण्यात रंगणार आहे. रेड एफएम आयोजित हा महोत्सव शिवाजीनगर येथील ई-स्क्वेअरमध्ये होणार असून, प्रेक्षकांसाठी विनामूल्य खुला असणार आहे. मराठी सिनेसृष्टीतील अनेक मान्यवर कलाकार, दिग्दर्शक आणि सिनेरसिक या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

गेल्या पाच पर्वांमध्ये या फिल्म फेस्टिव्हलने महाराष्ट्रातील चित्रपटप्रेमींमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. मराठी सिनेमाचा समृद्ध वारसा, बदलत्या काळातील कथा आणि प्रादेशिक कथनशैलीतील नव्या प्रयोगांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा महोत्सव राज्यातील महत्त्वाच्या सिनेमोत्सवांपैकी एक मानला जात आहे.

यंदाच्या महोत्सवात समकालीन चित्रपटांसोबतच काही गाजलेल्या क्लासिक चित्रपटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये 'जैत रे जैत', 'तिघी', 'गोंधळ' आणि 'दशावतार' या चित्रपटांचा समावेश आहे. याशिवाय विविध पॅनल डिस्कशन्स, दिग्दर्शक आणि कलाकारांशी संवाद तसेच प्रादेशिक कथाकथनाच्या बदलत्या प्रवाहांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर, अभिनेत्री अमृता सुभाष, अभिनेते गिरीश कुलकर्णी, दिग्दर्शक शिवराज वायचळ, अभिनेते सिद्धार्थ जाधव यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणून ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना 'लाईफटाईम अचिव्हमेंट अवॉर्ड' प्रदान करण्यात येणार आहे. मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीत पाच दशकांहून अधिक काळ दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

उदयोन्मुख दिग्दर्शक आणि नव्या पिढीतील कथाकथनाला प्रोत्साहन देण्यासाठी शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमासाठी फिल्म क्रिटिक्स गिल्ड आणि चित्रपट समीक्षक अनुपमा चोप्रा यांचे सहकार्य लाभले आहे. याबाबत माहिती देताना रेड एफएमच्या संचालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी निशा नारायणन यांनी सांगितले की, प्रादेशिक कथा अधिक मोठ्या सांस्कृतिक व्यासपीठावर पोहोचाव्यात, हा संस्थेचा कायम प्रयत्न राहिला आहे. मराठी सिनेमातील सर्जनशीलतेचा गौरव करत नव्या कथांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम असून, नव्या पिढीतील दिग्दर्शक आणि कथाकारांना प्रोत्साहन देतानाच प्रादेशिक कथाकथनाची ताकद साजरी करण्यासाठी रेड एफएम कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

## आपुलकी कर्करोग रुग्णालयाचा प्रकल्प भविष्यासाठी मैलाचा दगड ठरेल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : - कर्करोगाच्या विरोधात लढा देण्यासाठी आपण विविध पातळीवर प्रयत्न करत आहोत. पुणे महानगरपालिका आणि आपुलकी मेडिकल सेंटरच्या वतीने उभारण्यात आलेले हे केंद्र मैलाचा दगड ठरणार आहे. या मॉडेलच्या आधारावर भविष्यात असे अनेक रुग्णालयलये तयार करता येतील असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केले. आपुलकी मेडिकल सेंटरच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यक्त केला.

आपुलकी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) तत्त्वावरील कॅन्सर व कार्डियाक संबंधीत अत्याधुनिक उपचार पद्धती उपलब्ध असलेल्या बाणेर स्थित आपुलकी मेडिकल सेंटरचा रविवारी (१७ मे २६) रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आपुलकी मेडिकल सेंटर मॉडेलच्या आधारावर भविष्यात असे अनेक रुग्णालयलये तयार करता येतील. मागील काही वर्षांत कर्करोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यासाठीच्या उपचाराचा खर्चही मोठा असतो. या परिस्थितीत पीपीपी तत्वावर उभारण्यात आलेले हे रुग्णालयात मोठा दिलासा देणारे ठरणार आहे. सीजीएसएचच्या माध्यमातून उपचार करण्याची तयारी दाखवली याबाबद्दल आपुलकी हेल्थ केअरचे आभार आहेत. याप्रसंगी उपमुख्यमंत्री मा. ना. श्रीमती सुनेत्राताई पवार, खासदार मेधा कुलकर्णी, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार भीमराव तारकीर, पुणे महानगपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, गटनेते गणेश बिडकर, महापालिकेतील विरोधी पक्ष नेते निलेश निकम, पुणे महापालिका आयुक्त मा. नवलकिशोर राम, भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, नगरसेवक यांची देखील प्रमुख उपस्थिती होती. त्याआधी कोनशिला अनावरणानंतर मुख्यमंत्री व उपस्थित मान्यवरांनी आपुलकी मेडिकल सेंटर अत्याधुनिक सुविधांची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. आपुलकी मेडिकल सेंटरचे चेअरमन डॉ. प्रितेश मुनोत व व्यवस्थापकीय संचालक पियुष राका यांनी मान्यवरांना मेडिकल सेंटरव उपलब्ध आधुनिक सुविधांची माहिती दिली.पुणे महानगरपालिकेसोबत अशा पथदर्शी प्रकल्पाची उभारणीत केलेल्या कामगिरीसाठी यावेळी महापालिका सहायक आरोग्य प्रमुख डॉ. संजीव वावरे व आपुलकी हेल्थकेअर लिमिटेडचे सुनील नहार, सचिन नहार व रवी जैन यांचा मुख्यमंत्र्याच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पुणे व महाराष्ट्रभरातील नागरिकांना अत्याधुनिक-परवडणारी व जागतिक दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बाणेर स्थित हे अत्याधुनिक, १५० खाटांचे कर्करोग आणि हृदयरोग रुग्णालय प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे.

# भ्रष्टाचारमुक्त शासनासाठी कसबा गणपती चरणी प्रार्थना

### तरुणांनी खचून जाऊ नये : शिवसेना नेत्या, आ. डॉ. नीलम गोऱ्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यपदी सलग पाचव्यांदा बिनविरोध निवडून आल्यानंतर शिवसेना नेत्या तथा आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रविवारी पुण्यातील ग्रामदैवतांचे दर्शन घेत धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला अभिवादन केले. यावेळी त्यांनी राज्यातील विविध सामाजिक प्रश्नांवर भाष्य करत भ्रष्टाचारमुक्त शासनासाठी प्रार्थना केल्याचे सांगितले. श्री कसबा गणपती, श्री तांबडी जोगेश्वरी, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती व श्री दत्त मंदिर या सर्व ठिकाणी त्यांनी विधिवत पूजा व आरती करत दर्शन घेतले.



यावेळी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, आज समाजात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे काटकसरीने आणि जबाबदारीने काम करण्याची गरज आहे. याच भूमिकेतून मर्यादित स्वरूपात कार्यकर्त्यांसोबतचा आजचा दौरा आयोजित करण्यात आला.

त्या पुढे म्हणाल्या की, महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. गोरगरिब आणि सामान्य कुटुंबांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अबाधित राहिला पाहिजे. शासनाच्या माध्यमातून गरीब कुटुंबांना अधिकाधिक योजनांचा लाभ मिळावा, त्यांचे जीवन सुलभ व्हावे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.

नीटसारख्या परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटनांवर बोलताना त्यांनी चिंता व्यक्त केली. पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नैराश्य निर्माण झाले असून काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे, असे त्यांनी सांगितले.

मी कसबा गणपती चरणी प्रार्थना केली की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तसेच महाराष्ट्रातील महायुती सरकारला भ्रष्टाचारमुक्त शासन करण्याची शक्ती मिळो. सामान्य लोकांच्या प्रश्नांमध्ये अडथळे निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रभावी कायदा व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

तरुणांना आवाहन करताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, काही अडचणी आल्या असतील तरी त्यातून मार्ग नक्की निघेल. तरुणांनी खचून जाऊ नये. सर्व परीक्षांबाबत सरकार योग्य ती कारवाई करेल, असा मला विश्वास आहे.

यावेळी, प्रकाश ढमढेरे शिवसेना वैद्यकीय कक्ष शहर प्रमुख, आनंद गोयल शहर संघटक, राजाभाऊ भिलारे पुणे शहर समन्वयक, हेमंत बत्ते वडगाव शेरी विधानसभा प्रमुख, संदीप शिंदे पुणे शहर सचिव, राजू विटकर झोपडपट्टी शहर प्रमुख, महेंद्र जोशी, राहुल खैरे, सुधीर कुरुमकर, निलेश घारे, कांताताई पांढरे संपर्क प्रमुख बारामती, अनिता परदेशी विधानसभा क्षेत्र प्रमुख वडगाव शेरी, भारती महेंद्र जोशी शिवसेना उपशहर प्रमुख पर्वती मतदारसंघ, अनिता शिंदे स्त्री आधार केंद्र आदी मान्यवर उपस्थित होते.

## द•ख•ल

### डाळिंब तोडण्यावरून शेतकऱ्यावर हल्ला

**श्रीगोंदा :** बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीतील बेलवंडी येथे शेजारील शेताच्या वादातून एक धक्कादायक घटना घडली आहे. डाळिंब तोडण्याच्या कारणावरून शेतकऱ्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दत्तात्रय पांडुरंग घोडेकर (वय ५०, रा. बेलवंडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अक्षय राजू शेंडगे आणि एकनाथ राजू शेंडगे (रा. शेंडगे वस्ती, बेलवंडी) यांच्याविरुद्ध बेलवंडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १६ मे रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास खरातवाडी येथील गट क्रमांक २२३ मधील शेतात ही घटना घडली. फिर्यादी व आरोपी यांची शेती शेजारी असून, त्यांच्यात यापूर्वीपासून शेतीच्या कारणावरून वाद सुरू होते.दरम्यान, आरोपी फिर्यादीच्या शेतातील डाळिंब घेऊन जात असल्याची विचारणा करण्यासाठी फिर्यादीचा मुलगा आणि सून गेले असता, त्यांच्यासोबत वाद झाला. त्यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद सोडविण्यास गेलेल्या फिर्यादी दत्तात्रय घोडेकर यांच्यावर लोखंडी कोयत्याने वार करून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी प्रभारी अधिकारी नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास स. फौजदार औटी करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे. पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे.

### दारू, गांजाच्या नशेत वृद्धावर तलवारीने हल्ला ; मोबाईल, रोकड लंपास

**श्रीगोंदा :** टाळू पेडगाव येथील एका युवकाने दारू आणि गांजाच्या नशेत अक्षरशः धुमाकूळ घालत शेडगाव हद्दीत ७५ वर्षीय वृद्धावर तलवारीने जीवघेणा हल्ला करून लूट केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पेडगाव येथील दिलशार राज्या पवार याची पत्नी नांदत नसल्याने तो सासुरवाडी जालालपूर येथे गेला होता. तेथे दारू आणि गांजाच्या नशेत रात्री वाद घालत, आज कोणालातरी मारून तुझे नाव घेतो, अशी धमकी सासऱ्याला दिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर आरोपीने शेडगाव हद्दीतील घोड कॅनॉलजवळ राहणारे ज्ञानदेव केदारी (वय ७५) यांच्यावर तलवारीने हल्ला केला. हल्ल्यानंतर त्यांच्या खिशातील मोबाईल आणि ३ हजार रुपये घेऊन तो पसार झाला. घरातील लोकांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक जागे झाले. जखमींना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, जखमीच्या मुलाने वडिलांच्या मोबाईलवर फोन केला असता आरोपीने फोन उचलून हे मीच केलं अशी कबुली दिल्याचे समोर आले. तपासादरम्यान श्रीगोंदा पोलीस स्टेशन यांनी चोरीस गेलेल्या मोबाईलचे लोकेशन ट्रॅक केले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता राज्या साईत्या पवार, करवंदी राजा पवार, दिलशार राजा पवार, समीर राजा पवार व इतर आरोपी मोबाईल आणि तलवार टाकून उसाच्या शेतात पसार झाले. आरोपींचा शोध घेण्यासाठी माजी सरपंच विजय शेंडे यांच्या मदतीने ड्रोनचा वापर करण्यात आला. अखेर सायंकाळी सहाच्या सुमारास नागरिकांनी आरोपीला उसाच्या शेतातून पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.याप्रकरणी जखमींच्या पत्नी हिराबाई केदारे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास संजय वाघमारे करीत आहेत.

### शिरसगाव बोडखा येथे स्मृती दिनानिमित्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, पुस्तके भेट



**श्रीगोंदा :** तालुक्यातील शिरसगाव बोडखा येथे दिवंगत कमळाबाई तुकाराम पाडळे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांच्या स्मृतीला अनोखी मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महेंद्र शिंदे होते. उबाळे, पाडळे आणि नेटवटे परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी रमेश पाडळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरसगाव, देशमुख वस्ती आणि गोंटेवस्ती येथील विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप केले. तसेच गावातील वाचनालयासाठी कपाट व पुस्तके, तर बौद्धविहारासाठी भगवान बुद्धांची मूर्ती भेट देण्यात आली.कार्यक्रमात रामदास ठाकर, प्रशांत चव्हाण यांचे प्रबोधनपर व्याख्यान झाले. उपस्थित मान्यवरांनी दिवंगत कमळाबाई पाडळे यांच्या सामाजिक कार्याची आठवण करून त्यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला.याप्रसंगी अनेक मान्यवर, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष उबाळे यांनी केले, तर रमेश पाडळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.स्मृतीदिन फक्त आठवणींचा नसतो, तो समाजासाठी काहीतरी देण्याचा संकल्प असतो, याची प्रचिती शिरसगावातील या उपक्रमातून आली.

### पालकमंत्र्यांना जवळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा भेट



**अहिल्यानगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व्हावा तसेच समाजामध्ये संविधान आणि सामाजिक समतेची जाणीव अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्रातील विविध लोकप्रतिनिधींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळे भेट देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा भेट देण्यात आला. पारनेर तालुक्यातील जवळा येथे आयोजित विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्यादरम्यान हा कार्यक्रम पार पडला. बार्टी संस्थेचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद तसेच कॉन्ट्रॅक्टर आमिर शेख यांच्या वतीने पालकमंत्री विखे पाटील यांना हा पुतळा सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी बार्टी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशिक्षणपर उपक्रमांची माहितीही मान्यवरांना देण्यात आली. यावेळी पारनेर तालुक्याचे आ. काशिनाथ दाते, विश्वनाथ दादा कोरडे, अशोकराव सावंत, विनायक देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थेंबासाठी संघर्ष.. जगण्यासाठी धडपड.. बारा गावांची करुण कहाणी !

## तालुका तहानेने व्याकुळ ; तहान भागविण्यासाठी धावताहेत टँकर ; बुऱ्हाणनगर योजनेत तांत्रिक अडथळा

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यातील बारा गावांची तहान भागवण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. डोंगर उतारावरील विविध गावांमधील विहिरी, कूपनलिका कोरड्याठाक पडल्या असून, बहुतांश जलस्रोत बंद झाले आहेत. त्यामुळे पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. ४४ गावांसाठीच्या बुऱ्हाणनगर प्रादेशीक पाणीपुरवठ्यात तांत्रिक अडचणी आल्याने या गावांना पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे.

उष्णतेचा कहर सुरू असुन विविध गावांतील पाणीसाठा कोरडा पडल्याने या गावांना तीव्र पाणीटंचाईचा सामना सहन करावा लागत आहे. दि. १० एप्रिलपासून काही गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या तालुक्यात बारा गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू असुन कोल्हेवाडी गावाचा टँकरचा प्रस्ताव पंचायत समितीला प्राप्त झाला आहे. तसेच जेऊर परिसरातील वाड्यावस्त्यांवरही तीव्र पाणी टंचाई जाणवण्यास सुरुवात झाली आहे.

गर्भगिरीच्या डोंगर उतारावर वसलेल्या गावांना तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. या गावांत पावसाच्या सुरुवातीलाच भूजल पातळी वाढते, तर उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाई जाणवू लागते. इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी यांसह ठराविक गावांना दरवर्षी उन्हाळ्यात टँकरवर अवलंबून राहावे लागते. इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी या तीन गावांना १० एप्रिलदरम्यान टँकर सुरू करण्यात आले आहेत.

अतिवृष्टी होऊनही काही गावांनी उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. तालुक्यात गेल्या वर्षी अतिवृष्टीने धुमाकूळ घातला. नद्या नाल्यांना महापूर आला. तलाव, नाले, बंधारे तुडुंब भरले, तरीही उन्हाळ्यात टँकर सुरू करावे लागत आहेत. नगर तालुका टँकरमुक्त करण्यासाठी 'पाणी आडवा पाणी जिरवा' मोहीम गावोगावी सक्रियपणे राबवण्याची गरज आहे. भौगोलिक संरचनेनुसार डोंगर उतारावर वसलेल्या गावांनी पाणीटंचाईच्या झळा जाणवतात, हे वास्तव आहे. अशा गावांनी पशुधनाच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. जेऊर परिसरातील वाड्या - वस्त्यांवरदेखील पाणीटंचाईची समस्या जाणवण्यास सुरुवात झाली आहे. येथे देखील लवकरच टँकर सुरू करावे लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सांडवे गावाला पाणीपुरवठा करणारी विहीर कोरडी पडली असुन गेल्या महिनाभरापासुन गावकरी पाणीटंचाईचा सामना करित होते. आता टँकर सुरू झाले आहेत.

**बापू खांदवे (सरपंच, सांडवे)**

बहिरवाडी गावाला पाणीपुरवठा करणारे जलस्रोत आटल्याने पाणीटंचाई निर्माण झाली. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच गावाला टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. दरवर्षी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची समस्या उद्भवते.

**अंजना येवले (सरपंच, बहिरवाडी)**

**प्रशासकराज मुळे अधिकाऱ्यांवर जबाबदारी !**

जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच बहुतांशी ग्रामपंचायत मध्ये सद्यस्थितीत प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रशासनाला गावची तहान भागविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. पदाधिकारी यांना स्थानिक परिस्थितीची संपूर्ण माहिती असल्याने त्यांची पाणीपुरवठा करताना मोठी मदत अधिकाऱ्यांना होत असते. परंतु प्रशासकराज मुळे पाणी नियोजनाची सर्व जबाबदारी अधिकाऱ्यांवर आली आहे.





**टँकरने पाणीपुरवठा सुरू असलेली गावे !**

इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी, मदडगाव, रांजणी, अकोळनेर, खांडके, भोयरेपठार, बाळेवाडी, भोयरे खुर्द, उक्कडगाव, सांडवे या बारा गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. तर कोल्हेवाडी गावाने टँकर मागणीचा प्रस्ताव दिला आहे.

# कर्जत तालुक्यातील ९ गावांच्या ६४ वाड्यावर

## नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** कर्जत तालुक्यातील ९ गावांसाठी ९ पाण्याचे टँकर मंजूर करण्यात आले असून यात ६४ वाड्या-वस्त्यांतील १६ हजार ९२९ नागरिकांची तहान भागवली जात आहे. कर्जत तालुक्यातील मुळेवाडी, डिकसळ, कापरेवाडी, खांडवी, कौडाने, पिंपळवाडी, धालवडी, राक्षसवाडी खुर्द आणि सोनाळवाडी या गावांच्या टँकर प्रस्तावानुसार तात्काळ पाण्याचे टँकर मंजूर करण्यात आले असल्याची माहिती गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांनी दिली.

सध्या उन्हाच्या वाढत्या तापमानाने कर्जत तालुक्यातील अनेक गावांत नैसर्गिक जलस्रोताची पातळी कमालीची खालावली गेली आहे. यात बहुतांश ठिकाणी गंभीर पाण्याची टंचाई निर्माण झाली असून तालुका प्रशासनाचा टंचाई विभाग सतर्क ठेवण्यात आला आहे. कर्जत तालुक्यातील मुळेवाडी, डिकसळ, कापरेवाडी, खांडवी, कौडाने, पिंपळवाडी, धालवडी, राक्षसवाडी खुर्द आणि सोनाळवाडी या गावांनी कर्जत पंचायत समितीकडे टँकर प्रस्ताव दाखल केले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तात्काळ टँकर मंजुरी घेत वरील ९ गावातील ६४ वाड्या-वस्त्यांना ९ टँकरद्वारे १६ हजार ९२९ नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अजिंक्य सुर्यवंशी यांनी दिली.

# वनविभागाने केले 'तरसा 'चे रेस्क्यु ; उष्माघाताने होते घायाळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**करंजी :** उष्णतेने माणसाची लाही लाही होत असतानाच वन्यप्राण्यालाही त्याचा फटका बसला असून असेच एक उष्माघाताने त्रस्त असलेल्या तरसाय वनविभागाने नुकतेच रेस्क्यू करून त्याला जीवदान दिले आहे.

वनपरिक्षेत्र पाथर्डी मधील करोडी येथे डोंगरालगतच्या भागात एक तरस उष्माघाताने घायाळ झाले असल्याचे काही ग्रामस्थांनी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना मोबाईलवर माहिती देऊन कळवले. त्यावेळी वनपरिक्षेत्राधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिमंडळ अधिकारी बबन मंचरे ,वनरक्षक आप्पा घनवट, वर्षा गीते, वनसेवक लक्ष्मण मरकड, वाहन चालक शिवनाथ जिवडे, प्राणी मित्र सुशांत मनवरे या पथकाने डोंगराळ भागात उन्हाने त्रस्त असलेल्या तरसास घायाळ अवस्थेत पकडले ( रेस्क्यू ) केले. त्याचेवर पशुवैद्यकीय अधिकारी पाथर्डी डॉ.सीमा रासकर यांच्याकडून उपचार करून घेतले.तर साला थंड पाण्याने अंघोळ घालून पाणी पाजले हे तरस पूर्ण सावध झाल्यानंतर या तिने त्याला पुन्हा जंगलात सोडून दिले.वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या तरसास जिवदान दिल्याबद्दल वन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ग्रामस्थांकडून मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात येत आहे.

# नेत्रदान, अवयवदान जनजागृतीच्या योगदानाची दखल



**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना पुणे येथील आनंदी युनिव्हर्सल फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बालगंधर्व सभागृह येथे झालेल्या सन्मान सोहळ्यात पुणे रोटरी क्लबचे अध्यक्ष अशोक सिंघानिया व अभिनेत्री नेहा घोणसे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश विटकर, सचिव तेजस्विनी दिवटे, उद्योजक कांतीलाल कटारिया आदी उपस्थित होते.

अशोक सिंघानिया म्हणाले की, जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. अभिनेत्री नेहा घोणसे यांनी जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक युवकांनी सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सातत्याने नेत्रसेवा कार्य सुरू ठेवले आहे.

# कांदा भाववाढ, शेतकऱ्यांची कर्जमाफी मंत्रालयावर मोर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना कांदा भाववाढ व शेतकरी कर्जमाफी यासाठी आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यांनी निवेदन दिले.**

**निघोज :** शेतकरी कर्जमाफी मिळालीच पाहिजे तसेच कांद्याला किमान पंचवीस ते तीस रुपये किलोला भाव मिळण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत या मागणीसाठी जूनच्या पहिल्या आठवड्यात मुंबई मंत्रालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्याचा निर्णय आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यांनी घेतला आहे. राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पारनेर येथे निवेदन देण्यात आले आहे. ढवण यांनी निवेदनात म्हटले आहे की, ना. विखे पाटील यांनी गेली चाळीस वर्षात राजकारण व समाजकारण माध्यमातून शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत युती सरकारच्या माध्यमातून अतिशय चांगले काम केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत शेतकरी कर्जमाफी आश्वासन दिले होते मात्र या आश्वासनांची अद्यापही पुर्तता झाली नाही. हे आश्वासन पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने कर्जमाफी करण्याची गरज आहे. सध्या कांद्याला फक्त १० ते १२ रुपये प्रती किलो भाव मिळत आहे या भावाप्रमाणे शेतकरी आणखीनच कर्जबाजारी होत आहे. कांद्याला किमान पंचवीस ते तीस रुपये किलो भाव देण्याची गरज आहे. सध्या राज्यात व केंद्रात महायुतीचे सरकार असून या दोन्ही सरकारांनी विचार करुण कांदा निर्यात धोरण तातडीने राबविण्याची गरज आहे. कांद्याची निर्यात करुण कांद्याला सर्वाधिक भाव देण्याची गरज आहे.

# हातगावात महामानवांचा विविध उपक्रमांनी

## भीम महोत्सव उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे सालाबादप्रमाणे या वर्षी तथागत भगवान गौतम बुद्ध, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुलें, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सम्राट अशोक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांच्या संयुक्त जयंती हा सुवर्ण महोत्सव सोहळा असल्याने दोन दिवसीय भीम महोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये तक्षशिला बुद्ध विहारामध्ये सामुदायिक बुद्ध व धम्म वंदना घेण्यात आली. लहान मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदवणाऱ्या मुलांना बक्षीस देण्यात आले. महामानवांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. वंदना दळवी प्रस्तुत भीमगीतांचा कार्यक्रम झाला. शाक्यपुत्र भंते राहुल यांची धम्म देशना (प्रवचन) पार पडली. महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमात सहभाग नोंदवणाऱ्या महिलाना बक्षिसे देण्यात आली. त्यानंतर जाहीर सभा पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी अण्णासाहेब घरवाढवे हे होते. मुंबई महापालिका गट नेते व युवा नेते अनिकेत संसारे, वंचित बहुजन आघाडीचे प्रा.किसन चव्हाण यांनी महामानवांच्या ज्वलंत कार्याचा इतिहास सांगून महामानवाच्या विचारसरणीचे शासन कसे अस्तित्वात येईल यासाठी सर्वांनीच एकजुटीने प्रयत्न करावे असे सांगितले. मुबईचे युवा नेते सुशांत दोडमणी, संतोष भराट, संजय गलांडे, बद्रीनाथ बर्गे, सुनील खंडागळे यांनी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास राहुल सातपुते, राजू मोरे,विजय वाघमारे संतोष सपकाळ, राहुल हिरे, कुमार बनसोडे, मंगेश सोनकांबळे, अस्लम खान,प्रशांत जगताप, चंद्रकांत वाघमारे, पोपटराव सरोदे, प्यारेलाल शेख, सतिष मगर, प्रकाश भोसले, राम अंधारे, भाऊराव भोंगळे, रोहिदास भोगले, श्रीधर मगर, प्रथमेश सोनवणे, शरद चाबुकस्वार, विठ्ठल अभंग, अरुण मातंग, प्रा. भाऊसाहेब मुरकुटे,दिलीप आंबेकर, गोरख कदम, रविराजे गायकवाड उपस्थित होते.

# जलजीवन योजनेच्या कामांची चौकशी करा

## मंजूर प्रस्तावानुसार कामे नाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** पारनेर तालुक्यातील मौजे नारायणगव्हाण येथे काही महिन्यांपासून बंद असलेल्या जलजीवन योजनेच्या कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, मंजूर प्रस्तावानुसार कामे न झाल्याचा आरोप करत उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून ग्रामस्थांना नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नारायणगव्हाण येथील जलजीवन योजनेचे काम मंजूर आराखड्यानुसार न करता अनेक ठिकाणी परस्पर बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे गावात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य कारवाई करण्यात यावी तसेच रखडलेली व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून गावातील नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

हे निवेदन देताना नारायणगव्हाण विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन गणेश विक्रम शेळके, युवा सेना पारनेर तालुका अध्यक्ष अजिंक्य दरेकर तसेच पारनेर तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक काशिनाथ नवले उपस्थित होते. त्यावेळी आमदार काशिनाथ दाते व माजी सभापती गणेश शेळके हे देखील उपस्थित होते. प्रशासनाने गावातील मूलभूत पाणीप्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

**पालकमंत्र्यांनी घेतली तातडीची दखल**

सदर निवेदनाची पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तातडीने दखल घेतली असून, त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याच्या सूचना दिल्या. तसेच जलजीवन योजनेच्या कामांचा सविस्तर चौकशी अहवाल चार दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश संबंधित प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## बेलापूरात मृतदेह आढळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर -पढेगाव रस्त्यावरील जुन्या एका पिठाच्या गिरणी शेजारी भरदिवसा एका दिव्यांग व्यक्तीचा बेवारसपणे मृतदेह रविवारी (दि.१७ ) मे रोजी सकाळी आढळून आला.त्यामुळं परिसरात एकच खळबळ उडाली होती.या घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती.ओळख पटणे कठीण असल्याने पोलिसांनी सुत्रे फिरवित श्रीरामपूर येथील नाव व रहिवाशी समजले.मनोहर शांतवन कदम ( वय ५५ ) असे मृत व्यक्तीचे नाव असून, घरकूल परिसरातील, साईनगर वॉर्ड नं.३ श्रीरामपूर येथील रहिवाशी असल्याचे सांगण्यात आले. आधीच मृतदेहाची ओळख पटल्यानतर मनोहर कदम यांचा मुलगा कृष्णा कदम यांच्याशी संपर्क साधला असता, त्याला बोलवून घेत आपलाच मृतदेह असल्याने त्यास त्याने दुजोरा दिला.पुढील पंचानाम्यासाठी साखर कामगार रुग्णालयात मृतदेह पाठविण्यात आला असून, मनोहर कदमचा मुत्यू कश्यामुळे झाला ? त्यांचे मुत्यूचे कारण अद्याप समजू शकले नाहीत. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसांत मुत्यूची नोंद करण्यात आली.पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉ.संपत बडे, भारत तमनर,नंदू लोंखडे, जालिंदर माने, होमगार्ड महेश थोरात यांच्या सह पोलीस हेड कॉ.बाळासाहेब कोळपे हे अधिक तपास करित आहेत.



# पाणीटंचाई निवारणास सर्वोच्च प्राधान्य द्या : ना. विखे

## प्रशासकीय दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाईचे निर्देश




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील पाणीटंचाई निवारणाच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देत गावे व वाड्यांना विनाविलंब पाणीपुरवठा करावा. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिले.

संगमनेर येथे तालुकास्तरीय पाणीटंचाई व चाराटंचाई निवारण उपाययोजनांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आ. अमोल खताळ, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. विखे पाटील म्हणाले की, सध्या तालुक्यात १९ टँकरद्वारे २५ गावे व ५४ वाड्यांना पाणीपुरवठा सुरू आहे.

टँकरचे वेळापत्रक निश्चित करून ग्रामस्थांना आगाऊ माहिती द्यावी. टँकर गावात पोहोचल्यावर ग्रामसेवक व तलाठी यांची उपस्थिती बंधनकारक राहील. आरोग्याच्या दृष्टीने टँकरचे पाणी थेट विहिरीत न सोडता प्लास्टिक टाक्यांमधून वितरण करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. नद्यांमधील वाढते प्रदूषण आणि पिण्याच्या पाण्याची खालावलेली गुणवत्ता चिंताजनक असल्याचे सांगत, कालवे व नद्यांमध्ये सांडपाणी सोडणाऱ्या नगरपालिका व कारखान्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

टंचाईच्या काळात सर्वसामान्य जनतेला पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. टँकर संदर्भात कोणतीही तक्रार येणार नाही, याची अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

**अमोल खताळ, आमदार, संगमनेर विधानसभा**

पिण्याच्या पाण्याचे शंभर टक्के नमुने तपासून त्याची नोंद ठेवण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या. वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात. अनधिकृत वीजजोडण्या तोडण्याची मोहीम राबवावी तसेच वादळामुळे पडलेले वीजखांब तत्काळ उभारावेत, असेही त्यांनी सांगितले. जलजीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देत, उपकंत्राटाद्वारे कामे करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.

# कांद्याला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**गंगापूर** : तालुक्यातील लखमापूर येथील एका अल्पभुधारक शेतकऱ्याने कांद्याला मिळालेल्या कवडीमोल भावामुळे सोसायटी व ईतर कर्ज कसे फेडावे या नैराश्यातून विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. चंद्रभान कचरू गाडे (वय ५६, रा. दत्तमंदीर रोड, लखमापूर) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गंगापूर तालुक्यातील लखमापूर येथील चंद्रभान गाडे हे शुक्रवार (दि.१५) रोजी रात्री सुमारे ८ वाजल्यापासून घरातून बाहेर गेले होते. मात्र ते रात्री उशिरापर्यंत परत न आल्याने कुटुंबीय चिंतेत होते. शनिवारी (दि.१६) सकाळी गावाजवळील पाझर तलाव परिसरात काही महिला शौचास गेल्या असता गाडे हे बेशुद्ध अवस्थेत पडलेले आढळून आले. त्यांनी तात्काळ ग्रामस्थांना याची माहिती दिली. यानंतर ग्रामस्थांनी त्यांना तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

चंद्रभान गाडे हे एका पायाने अपंग होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक अविवाहित मुलगा तसेच दोन विवाहित मुली असा परिवार आहे. लखमापूर शिवारात सुमारे एक एकर शेती असून त्यांनी यावर्षी कांद्याची लागवड केली होती. उत्पादन चांगले झाले असतानाही बाजारात कांद्याला अत्यंत कमी दर मिळाल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची चिंता त्यांना सतावत होती. विविध सेवा संस्थेचे सुमारे २६ हजार रुपये कर्ज तसेच इतर उसनवारीचा ताणही होता. कांदा पिकासाठी झालेला प्रचंड खर्च, आर्थिक अडचणी, बाजारभावातील घसरण, पती-पत्नीचे आजारपण तसेच मुलाच्या शिक्षण व लग्नाचा खर्च या सर्व कारणांमुळे आलेल्या नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.या घटनेमुळे लखमापूर परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# एलसीबी पीआय कबाडी यांच्यावर कारवाई करा

## जप्त अमली पदार्थ विल्हेवाट प्रकरणी नव्याने चौकशीची डॉ. मकासारे यांची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील जप्त अमली पदार्थ प्रकरणाला आता नवे वळण मिळाले असून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. राहुरी तालुक्यातील वळण येथील डॉ. विजय अण्णासाहेब मकासरे यांनी पोलिस अधीक्षक मुमुक्षा सुदर्शन यांच्याकडे दिलेल्या निवेदनातून या प्रकरणाची नव्याने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जप्त अमली पदार्थांची सुरक्षित साठवणूक आणि नियमित तपासणी होणे आवश्यक असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यातील मुद्देमालामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला. या प्रकरणात पोलिस हवालदार शामसुंदर गुजर याच्यावर कारवाई करण्यात आली असली, तरी त्यामागील प्रमुख सूत्रधारांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या सरकारी गोदामातून कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ चोरी करून त्यांची विक्री करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून संरक्षण दिले जात असल्याचाही आरोप डॉ. मकासरे यांनी केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, अमली पदार्थ जप्तीनंतर त्यांची तपासणी, नोंद आणि सुरक्षा यासाठी असलेले नियम पाळण्यात आले नाहीत.

मुद्देमाल कक्षाची नियमित तपासणी झाली नाही, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करून देखरेख ठेवण्याची तरतूद असतानाही ती करण्यात आली नाही. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्याचे महसूल मंत्री योगेश कदम यांनी चौकशीचे आदेश दिले. तसेच श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले यांनीही या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, डॉ. मकासरे यांनी पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना तत्काळ निलंबित करून त्यांची नव्याने चौकशी करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांची बदली पोलिस नियंत्रण कक्षात करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

या प्रकरणामुळे जिल्ह्यातील पोलिस प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून अमली पदार्थ प्रकरणातील गैरव्यवहाराबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# मॉर्टगेज लोनसाठी शेतकऱ्यांना बँकांचे दरवाजे बंद

## थकबाकी वाढल्याने आखडता हात; केवळ पीक कर्जवाटपालाच प्राधान्य

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत पीककर्ज बिनव्याजी मिळते. पण, दोन लाखांवरील रकमेसाठी शेती तारण ठेवावी लागते. याशिवाय शेतकऱ्यांना बँकांकडून तीन लाखांवर मध्यम व दीर्घ मुदतीचे तारण कर्ज दिले जाते. त्यात शेती, विहीर दुरुस्ती, पाइपलाइन अशी कामे करता येतात. मात्र, शेती तारण कर्जाची रक्कम बहुतेक शेतकऱ्यांनी दुसरीकडेच वापरली. त्यामुळे तारण कर्जाची थकबाकी दिवसेंदिवस वाढत गेली. या पार्श्वभूमीवर आता बँकांनी तारण कर्ज (मॉर्टगेज लोन) देणेच बंद केल्याची बाब समोर आली आहे.

जमीन तारण ठेवून घेतलेले कर्ज शेतकरी त्याच उद्देशासाठी वापरत नाहीत. कर्जाची ती रक्कम शेतकरी दुसऱ्याच अडचणींसाठी वापरतात. त्यामुळे तारण कर्जाची रक्कम दिवसेंदिवस वाढतच गेली. थकबाकी वाढल्यानंतर शेतकरी कर्जमाफीच्या आशेवर थांबतात. या पार्श्वभूमीवर आता बहुतेक बँकांनी शेती तारण कर्जवाटप बंद केले. काही बँकांनी हात आखडता घेतल्याचे अनुभव शेतकऱ्यांना येत आहेत.

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

'शेती तारण कर्ज बऱ्यापैकी बंदच केले आहे. आता आम्ही फक्त क्षेत्रानुसार शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करतो.'असे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी म्हणाले.

### इतर बँकांची भूमिका

रिझर्व्ह बँकेच्या २०२५ च्या परिपत्रकानुसार, बँकांकडून आता शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत पीककर्ज विनातारण मिळते. पण, त्यावर कर्ज हवे असल्यास त्यासाठी शेती तारण ठेवावी लागते. तीन लाखांपर्यंत पीककर्ज शेतकऱ्यांना मिळते. तरीपण, दोन लाखांवरील वाढीव एक लाख रुपयांच्या पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना शेती तारण ठेवावीच लागते.

# दागिन्यांसाठी दोन लाखांची मागणी; विवाहितेचा छळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : लग्नानंतर विवाहितेला माहेरहून दोन लाख रुपये आणण्यासाठी मानसिक व शारीरिक छळ करून मारहाण केल्या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पती व सासू विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना हनुमंतगाव ता. राहाता येथे घडली. याबाबत सौ. पल्लवी सोमनाथ घोलप (वय २३, रा. हनुमंतगाव ता. राहाता, हल्ली रा. जोगेश्वरी आखाडा ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांचा विवाह १६ जून २०२१ रोजी चिंचविहीरे ता. राहुरी येथे हिंदू धार्मिक पद्धतीने सोमनाथ अशोक घोलप यांच्याशी झाला होता.

विवाहानंतर त्या सासरी नांदत होत्या. फिर्यादीत नमूद केल्या प्रमाणे, जून २०२२ मध्ये मुलगा झाल्यानंतर घरकामास उशीर होत असल्याच्या कारणावरून सासू गयाबाई घोलप या सतत टोमणे मारत व पतीकडे खोट्या तक्रारी करत होत्या. त्यानंतर पती सोमनाथ घोलप हेही शिवीगाळ करून मारहाण करू लागले. तसेच लग्नात मानपान व दागिने दिले नाहीत असे सांगत माहेरहून दागिन्यांसाठी दोन लाख रुपये आणण्याची मागणी करण्यात येत होती. फिर्यादीने माहेरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचे सांगितल्या नंतर आरोपींनी तिला शिवीगाळ करून मारहाण केली.

तसेच उपाशी ठेवून घराबाहेर काढल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यानंतर काही वेळा नातेवाईकांच्या मध्यस्थीने समझोता होऊन त्या पुन्हा सासरी गेल्या. मात्र, त्यानंतरही घरकाम, खाण्यापिण्याच्या कारणावरून त्रास देणे, चारित्र्यावर संशय घेणे, शिवीगाळ व मारहाण सुरूच असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. जून २०२५ मध्ये झालेल्या मारहाणीमुळे फिर्यादी माहेरी गेल्या होत्या. त्यानंतर त्यांनी भरोसा सेल येथे तक्रार अर्ज दिला होता. डिसेंबर २०२५ मध्ये समझोता झाल्यानंतर त्या पुन्हा सासरी राहण्यासाठी गेल्या. मात्र तेथेही छळ सुरूच राहिल्याने जानेवारी २०२६ मध्ये त्या पुन्हा माहेरी परतल्या. त्यावेळी त्यांचा मुलगा श्रीतेज याला पतीने स्वतःकडे ठेवून घेतल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, भरोसा सेल अहिल्यानगर यांनी दिलेल्या पत्रान्वये सौ. पल्लवी घोलप यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

त्यावरून पती सोमनाथ अशोक घोलप व सासू गयाबाई अशोक घोलप (रा. हनुमंतगाव, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करत आहेत.

# रामपूर बंधाऱ्यामध्ये बुडून मुलाचा मृत्यू

## मयत दिनेश जाधव श्रीरामपूरचा रहिवाशी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोल्हार** : राहाता तालुक्यातील रामपूर येथील प्रवरानदीवरील बंधाऱ्यात एका १४ वर्षीय मुलाचा नदीत पाय घसरून पडून पाण्याच्या जादा प्रवाहामुळे वाहून गेल्याची शनिवारी (दि. १६) मे रोजी दुर्दैवी घटना दुपारी घडली. दिनेश नितिन जाधव (वय १४ वर्षे रा. गोंधवणी ता.श्रीरामपूर ) असे मुलाचे नाव आहे. याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की,श्रीरामपूर येथील रहिवासी असलेल्या ते कुटुंब कोल्हार येथील अंबिकानगर वसाहतीत राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांकडे आले होते.

शनिवारी मुलगा दिनेश आपल्या आई-वडिलांसोबत नदीकाठी कपडे धुण्यासाठी आला होता. दरम्यान, बंधाऱ्याजवळ त्यावेळी दिनेशला पाण्याच्या प्रवाहाचा व नदीतील खड्यांचा काही अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडून वाहून गेला. त्यावेळी काही ग्रामस्थांनी त्याला वाचवायचा प्रयत्न केला,असता मात्र पाण्याचा प्रवाह जादा असल्याने त्वरित पोलीस प्रशासन आणि बचाव पथकाला संपर्क साधत बचाव टिमने कोणताही विलंब न करता रामपूर बंधाऱ्याकडे धाव घेऊन दिनेशचा शोधण्याचा प्रयत्न केला.

तो शनिवारी सायंकाळ पर्यंत मिळून आलेला नाही. सायंकाळी बचाव पथकाने पुन्हा रविवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास पोलीस प्रशासन आणि बचाव पथकाने नदीपात्रात संयुक्त शोधमोहीम हाती घेतली. पाण्याचा व प्रवाह आणि गाळ आणि नदीपात्रातील मोठं मोठे खड्डे यामुळे सुरुवातीला अडचणी येत होत्या.

मात्र अखेर बचाव पथकातील जवानांना दिनेशचा नदीपात्रात शोध घेत असतानाच मृतदेह मिळून आला. यावेळी मृतदेह पहाताच नातेवाईकांनी डोह फोडला होता. त्यावेळी अनेकजण भावूक झाले. यावेळी शिर्डी नगरपरिषद अग्निशमन विभागाचे साईनंद भामरे, तेजस वाणी, शुभम साठे,राहता नगरपरिषद अग्निशमन दलाचे ऋषिकेश सदाफळ, प्रशांत डांगे,अमोल बनसोडे, श्रीरामपूर पालिका अग्निशमन विभागाचे मुज्जू शेख, रोहित जाधव,राहुरी नगरपालिका व आपत्ती व्यवस्थापन ई.आर टी बचाव पथक संगमनेर, आपदा मित्र अनिल जाधव आणि रामराजे गायकवाड, पोलीस हेडकॉन्स्टेबल निवृत्ती साळवे पोलीस कॉन्स्टेबल विनोद कुदनर यांनी विशेष मदत केली असून, स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले.या दुर्देवी घटनेने कोल्हार आणि श्रीरामपूर परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहेत.

# आश्वी खुर्द येथील वाड्या-वस्त्यांवर राजहंस दूध संघाकडून पाणीपुरवठा

## नैसर्गिक संकटकाळात बाळासाहेब थोरात यांच्या सर्वोतोपरी मदतीच्या सूचना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : बुधवारी (दि. १३) संगमनेर तालुक्यात अचानक आलेल्या मान्सूनपूर्व वादळी वाऱ्याने आणि पावसाने आश्वी खुर्द परिसराला मोठा तडाखा दिला. या नैसर्गिक आपत्तीत अनेक ठिकाणी महाकाय झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडल्याने संपूर्ण परिसराचा वीज पुरवठा खंडित झाला होता.




वीज नसल्याने गावातील पाणी उपसा यंत्रणा आणि जलवाहिन्या ठप्प झाल्या, परिणामी ऐन उन्हाळ्यात नागरिकांसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी तातडीने संकटकाळात आश्वी ग्रामस्थांना मदतीच्या सूचना दिल्या. विजेअभावी पाणी टंचाई निर्माण झाल्याची माहिती गावातील शेतकरी विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी बाळासाहेब थोरात यांना कळवली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बाळासाहेब थोरात आणि डॉ. जयश्रीताई थोरात यांनी तातडीने 'राजहंस दूध संघा'तील अधिकाऱ्यांना आश्वी खुर्दमध्ये पाण्याचे टँकर पाठवण्याच्या सूचना दिल्या.

गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार असे सलग तीन दिवस गावातील ज्या भागात पाण्याची गरज आहे, अशा सर्व वाड्या आणि वस्त्यांवर राजहंस दूध संघाच्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जोपर्यंत सर्वकाही पुर्ववत होत नाही, तोपर्यंत पाणीपुरवठ्यासह इतर मदत देण्याची ग्वाही ग्रामस्थांना थोरात यांनी दिली आहे. दरम्यान, प्रत्येक कुटुंबाला आणि गरजू वस्तीला पुरेसे पाणी मिळावे यासाठी शेतकरी विकास मंडळाचे ज्येष्ठ आणि तरुण कार्यकर्ते भर उन्हात आणि रात्री विशेष परिश्रम घेत आहेत.

आपत्तीच्या काळात कार्यकर्त्यांनी दाखवलेली संवेदनशीलता आणि नियोजन यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत बाळासाहेब थोरात यांचे आभार मानले आहेत.

# नगर-मनमाड महामार्गावर पाच दिवसात दुसरा बळी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : नगर-मनमाड महामार्गावर राहुरी कृषी विद्यापीठ परिसरात शनिवारी दि. १६ मे रोजी सायंकाळी पावणे सात वाजेच्या सुमारास कंटेनर व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, राहुरी कृषी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर नगर-मनमाड महामार्गावरील रस्त्याचे काम सुरू असल्याने सध्या एकेरी वाहतूक सुरू आहे.

त्यातच शनिअमावास्यानिमित्त शनिभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी आणि अवजड वाहनांची वर्दळ असल्याने महामार्गावर मोठया प्रमाणात गर्दी होती. याच दरम्यान मधुकर डोके वय अंदाजे ५० वर्ष रा. बेलवंडी, ता. श्रीगोंदा हे आपल्या एम एच ४२ डी ४३९५ या बजाज कंपनीच्या दुचाकीवरून राहुरीच्या दिशेने जात होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीच्या हॅन्डला अचानक कट मारल्याने ते आपल्या दुचाकीसह रस्त्यावर कोसळले. त्याचवेळी शेजारून जात असलेला कंटेनर क्रमांक एम एच ०४ एच वाय ३४२७ च्या मागील चाकाखाली ते सापडल्याने व त्यांच्या डोक्यावरून कंटेनरचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. तसेच रुग्णवाहिका आणि पोलिसांना तत्काळ माहिती देण्यात आली.

त्यानंतर मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे राहुरी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला. या भीषण अपघातामुळे नगर-मनमाड महामार्गावर काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.महात्मा फुले कृषी विद्यापिठाच्या सुरक्षारक्षकांनी वाहतूक सुरळीत करण्याचे काम केले. मागील पाच दिवसांत नगर-मनमाड महामार्गावरील हा दुसरा बळी ठरला आहे. यापूर्वी १२ मे रोजी राहुरी खुर्द येथे दोन दुचाकींच्या अपघातात एका १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला होता. नगर मनमाड महामार्गाचे काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.